
रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १७ ◆ अंक २०४
www.ramprahar.com
# राम प्रहर
रविवार, ९ फेब्रुवारी २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## धारातीर्थ गडकोट मोहिमेसाठी उमरठला धारकऱ्यांचा महासागर



**पोलादपूर** : श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानची धारातीर्थ यात्रा अर्थात गडकोट मोहीम शनिवारी (दि. ८) संस्थापक संभाजी भिडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलादपूर तालुक्यातील उमरठ येथून सुरू झाली. या वेळी हजारो धारकऱ्यांसमवेत भिडे गुरुजींनी नरवीर तानाजी मालुसरे व शेलारमामा तसेच साखर येथे सुर्याजी मालुसरे यांच्या समाधीस्थळाचे दर्शन घेतले. कार्यक्रमाला राज्याचे रोहयो, फलोत्पादन व खारभूमीमंत्री भरत गोगावले, शिवप्रतिष्ठानचे अध्यक्ष रावसाहेब देसाई, अविनाश सावंत, सेनापती अशोक वीरकर, माजी जि.प. उपाध्यक्ष चंद्रकांत कळंबे यांच्यासह असंख्य धारकरी उपस्थित होते. यानंतर महाड तालुक्यातील किंजळोली बुद्रुक येथील नरवीर मुरारबाजी देशपांडे समाधीस्थळी नतमस्तक होऊन सर्व धारकरी ११ फेब्रुवारीला किल्ले रायगडला पोहचणार आहेत.

अंतरंग
मच्छीमारांना दीड कोटींचा गंडा घालणारा आरोपी जेरबंद/२
कलाकार प्रणित मोरेची भाजप नेत्यांकडून विचारपूस/६
टीआयपीएल सिझन १ चॅम्पियनशिपचे उद्घाटन/८

# भाजपने दिल्ली जिंकली!

## विधानसभा निवडणुकीत आपची दाणादाण; यंदाही काँग्रेसचा सुपडा साफ

**नवी दिल्ली** : वृत्तसंस्था

दिल्ली विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने बाजी मारली आहे. राजधानी दिल्लीत जवळपास दशकभर सत्तेत असलेल्या आम आदमी पक्षाला पराभवाचा सामना करावा लागला आहे, तर गेल्या दोन निवडणुकांप्रमाणे या वेळीदेखील काँग्रेसला एकही जागा जिंकता आलेली नाही. दरम्यान, दमदार विजयानंतर भाजपच्या दिल्लीसह देशभरातील कार्यकर्त्यांनी जल्लोष साजरा केला.

जाहीर झालेल्या निकालानुसार भाजपने एकूण ७०पैकी ४८ जागा जिंकत मिळवत स्पष्ट बहुमत मिळवले आहे. आपच्या पदरी २२ जागा आल्या. विशेष म्हणजे दिल्लीचे माजी मुख्यमंत्री आणि आपचे सर्वोच्च नेते अरविंद केजरीवाल यांना या निवडणुकीत पराभवाचा सामना करावा लागला आहे. भाजपचे प्रवेश वर्मा यांनी नवी दिल्ली मतदारसंघात केजरीवाल यांचा ४०८९ मतांनी पराभव केलो, तर जंगपुरा मतदारसंघातून भाजपचे तरविंदर सिंह मारवाह यांनी माजी उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांना पराभूत केले. याबरोबरच भाजप २६ वर्षांनंतर दिल्लीत सत्तेत आला आहे.



### अरविंद केजरीवाल यांचा पराभव

भारतीय जनता पक्षाने अभूतपूर्व यश मिळवलेले असताना दुसरीकडे आम आदमी पक्षाची दाणादाण उडाली. आपचे अनेक बडे नेते पराभूत झाले आहेत. यामध्ये पक्षाचे सर्वेसर्वा आणि माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनाही पराभवाची चव चाखायला लागली आहे. नवी दिल्ली मतदारसंघातून भाजपचे प्रवेश वर्मा यांनी त्यांचा चार हजारहून अधिक मतांनी पराभव केला. आपचा हुकुमी एक्का असलेले केजरीवाल पराभूत झाल्याने पक्ष कार्यकर्त्यांना मोठा धक्का बसला आहे. दिल्ली निवडणुकीतील हा सर्वात मोठा उलटफेर असल्याचे म्हटले जात आहे.

### विकास, सुशासन यांचा विजय -पंतप्रधान मोदी

दिल्लीतील भाजपच्या विजयानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी प्रतिक्रिया दिली आहे. जनशक्ती सर्वेपरि! विकास, सुशासन यांचा विजय झाला आहे. दिल्लीच्या सगळ्या भावा-बहिणींना मी वंदन करतो आहे. आम्हाला ऐतिहासिक विजय मिळवून दिला. सगळ्यांचा आशीर्वाद आम्हाला मिळाला आहे. मी तुम्हा सगळ्यांचे खूप खूप आभार मानतो. दिल्लीचा चौफेर विकास केला जाईल यात शंकाच नाही. दिल्लीकरांचे आयुष्य उत्तम होईल यासाठी आम्ही कुठलीही कसर सोडणार नाही. विकसित भारताच्या निर्मितीत दिल्लीची भूमिका महत्त्वाची असणार आहे. मला भाजपच्या कार्यकर्त्यांवरही गर्व आहे, ज्यांनी हा विजय मिळवण्यासाठी प्रचंड मेहनत घेतली. दिल्लीकरांची सेवा करण्यासाठी आम्ही आता अधिक बळकटीने काम करू, असे पंतप्रधान मोदींनी म्हटले आहे. त्यांनी भाजप मुख्यालयात कार्यकर्त्यांना मार्गदर्शनही केले.

> *दिल्लीत २७ वर्षांनंतर भारतीय जनता पक्षाचा झेंडा रोवला गेला आहे. मी तमाम कार्यकर्त्यांचे आणि जनतेचे मनापासून अभिनंदन करतो. दिल्लीकरांनी हा विश्वास देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर दाखवला आहे. या विजयाने आम आदमी पक्षाचे नेते अरविंद केजरीवाल यांचा बुरखा फाटला आहे. त्यांनी सातत्याने खोटी आश्वासने देऊन राज्य केले, ज्या परंपरेचा आज अंत झाला. काँग्रेस नेते राहुल गांधी यांनाही लक्षात आले होते की, त्यांना दिल्लीत काहीही हाती लागणार नाही. त्यामुळे त्यांनी हरल्यानंतर काय बहाणे सांगायचे याची तयारी आधीच करून ठेवली होती.*
>
> –**देवेंद्र फडणवीस**, मुख्यमंत्री, महाराष्ट्र

> *दिल्लीच्या जनतेने खोटेपणा, धोकेबाज आणि भ्रष्टाचाराच्या शीश महलाला नेस्तनाबूत करून दिल्लीला आप–दा मुक्त करण्याचे कार्य केले आहे. या प्रचंड जनादेशासाठी दिल्लीच्या जनतेचे मनापासून आभार! दिल्लीत विकास आणि विश्वासाचे एक नवे युग सुरू होणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वातील भाजपने आपली सर्व आश्वासने पूर्ण करून दिल्लीला जगातील एक नंबर राजधानी बनवण्याचा संकल्प केला आहे.*
>
> –**अमित शाह**, केंद्रीय गृहमंत्री

# कळंबोलीत आज कुस्त्यांचा आखाडा

## रुस्तम-ए-हिंद सिकंदर शेख विरुद्ध रुस्तम-ए-हिंद लाली गुरुदास पोल यांच्यात विशेष आकर्षण सामना

**कळंबोली** : रामप्रहर वृत्त

भारतीय जनता युवा मोर्चा पनवेलतर्फे येथील विधानसभा मतदारसंघात माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली आयोजित भव्य क्रीडा महोत्सव अर्थात नमो चषक २०२५ अंतर्गत ९ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ४ वाजता कळंबोली सेक्टर १६ येथे भव्य कुस्ती स्पर्धा होणार आहे.

या स्पर्धेत रुस्तम-ए-हिंद पैलवान सिकंदर शेख (सोलापूर) विरुद्ध रुस्तम-ए-हिंद लाली गुरुदास पोल (पंजाब) यांचा विशेष आकर्षण सामना होणार असून यामधील विजेत्या पैलवानास पाच लाख रुपये व मानाची गदा, तर महिलांच्या गटात महाराष्ट्र चॅम्पियन पैलवान अमेघा घरत (पनवेल) विरुद्ध महाराष्ट्र चॅम्पियन पैलवान अंकिता फातले (कोल्हापूर) यांचा खास आकर्षण सामना होणार आहे. यातील विजेत्या पैलवानाला ५१ हजार रुपये व मानाची गदा देऊन गौरविण्यात येणार आहे.




### विजेत्याला पाच लाख रुपये व मानाची गदा; विविध गटांमध्ये होणार सामने

याशिवाय पुरुषांच्या गटात महाराष्ट्र चॅम्पियन पै. निखिल कदम विरुद्ध महाराष्ट्र चॅम्पियन पै. अनिल कचरे, पै. शुभम वळखडे विरुद्ध पै. आकाश दुबे, पै. श्रेयश कचरे विरुद्ध पै. सुशांत देवमाने, पै. साजन पावशे विरुद्ध पै. निलेश कदम आणि पै. समाधान घनपट विरुद्ध विजय घुले यांच्या सामना रंगणार आहे. महिला गटात पै. स्नेहा येवले विरुद्ध वैष्णवी यादव आणि पै. रितिका कारंडे विरुद्ध गौरी जाधव यांचा विशेष सामना होणार आहे. (पान २ वर..)

# कामोठ्यात आज नमो चषक फुटबॉल स्पर्धा

**कामोठे** : रामप्रहर वृत्त

उदयोन्मुख खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी भारतीय जनता युवा मोर्चा पनवेलतर्फे येथील विधानसभा मतदारसंघात माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली आयोजित नमो चषक २०२५ क्रीडा महोत्सव अंतर्गत ९ फेब्रुवारीला सायंकाळी ४ वाजता कामोठे सेक्टर ६ येथील लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलच्या मैदानावर फुटबॉल स्पर्धा होणार आहे.

या स्पर्धेतील विजेत्या संघास २० हजार रुपये, द्वितीय क्रमांकास १० हजार रुपये, तृतीय क्रमांकाला पाच हजार रुपये आणि सर्व विजेत्या संघास प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. स्पर्धेसाठी सहा अधिक तीन असा खेळाडूंचा गेम फॉरमॅट असून पाच मुले, एक मुलगी आणि तीन सब्स्टीट्युट असा नऊ खेळाडूंचा सहभाग असणार आहे. प्रत्येक संघात एक मुलगी खेळाडू असणे अनिवार्य आहे.

युवा खेळाडूंना संधी देण्यासाठी आणि त्यांना प्रोत्साहन देणारी ही स्पर्धा म्हणजे केवळ फुटबॉल खेळण्याची संधी नसून पनवेलच्या क्रीडा संस्कृतीला एक नवीन दिशा देणारे व्यासपीठ आहे. त्यामुळे क्रीडाप्रेमींनी आणि नागरिकांनी या स्पर्धेला मोठ्या संख्येने उपस्थित राहून खेळाडूंना प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.






# मच्छीमारांना दीड कोटींचा गंडा घालणारा आरोपी जेरबंद

## मासळी खरेदी करून पैसे देण्यास टाळाटाळ

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग कोळीवाड्यातील मच्छीमारांकडून मासळी घेवून त्यांना तब्बल दीड कोटी रूपयांचा गंडा घालणारया व्यापारयाला अलिबाग पोलीसांनी थरारक पाठलाग करून बेडया ठोकल्या आहेत. नायब मजिद सोलकर असे त्याचे नाव असून न्यायालयाने त्याची रवानगी पोलीस कोठडीत केली आहे.

नायब सोलकर हा रत्नागिरी जिल्हयातील राजापूर तालुक्यातील नाटे गावचा रहिवासी आहे. घावूक मासे खरेदी करणारा व्यापारी असल्याचे भासवून त्याने अलिबाग कोळीवाडयातील मचछीमारांकडून आली मासळी खरेदी केली. मार्च २०२३ ते जानेवारी २०२४ या कालावधीत त्याने खरेदी केलेल्या मासळीची किंमत एक कोटी ५२ लाख रूपये इतकी आहे. मासे खरेदी केल्यानंतर तो पैसे देण्यास टाळाटाळ करू लागला. मच्छीमारांनी त्याच्याकडे पैशासाठी तगादा लावला परंतु तो काही पैसे देण्याचे नाव घेईना. अखेर फसवणूक झालेले मिथुन लक्ष्मण सारंग, रणजित भगवान खमीस, प्रदोश गोरखनाथ तांडेल, विशाल हरिश्चंद्र बना यांनी अलिबाग पोलीस ठाणे गाठून फसवणूकीची तक्रार दिली. या प्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल करून नायब याचा तपास सुरू केला.

गुन्हा दाखल झाल्यापासून सुमारे ५ महिन्यांपासून आरोपी नायब फरार होता. त्याने आपला मोबाईल देखील बंद ठेवला होता. पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक, अभिजित शिवथरे व अलिबाग उपविभागीय पोलीस अधिकारी, विनीत चौधरी यांचे मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे तसेच अलिबागचे पोलीस निरीक्षक किशोर साळे यांच्या सूचनेनुसार या गुन्हयाचा तपास पोलीस हवालदार हनुमंत सूर्यवंशी करीत होते. सुर्यवंशी यांनी सायबर सेलच्या मदतीने तांत्रीक तपास करून माहीती प्राप्त घेतली. त्यानंतर ५ फेब्रुवारी रोजी आरोपी नायब हा मुंबई येथुन रत्नागिरी येथे जाणार असल्याची गोपनीय बातमी मिळाली.

पोलीस पथकाने त्याच्या कारचा पाठलाग करून त्याला शिताफीने ताब्यात घेतले. नायब मजिद सोलकर याची चौकशी करून त्याला अटक करण्यात आली. त्याला न्यायालयासमोर हजर केले असता १० फेब्रुवारी पर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत. या गुन्हयाच्या तपासात हनुमंत सुर्यवंशी यांना हवालदार अतुल जाधव यांनी सहकार्य केले.

# आंबेनळी घाटात अपघातामध्ये १६ धारकरी जखमी



**पोलादपूर : प्रतिनिधी**

महाराष्ट्र स्टेट इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कार्पोरेशनच्या ताब्यात असलेल्या आंबेनळी घाटाच्या तीव्र वळण उतारावर शनिवारी (दि.८) पहाटे वाजण्याच्या संदर्भात सांगली जिल्ह्यातील अंकलखोप येथून आलेल्या पिकअप जीप कलंडून अपघात झाला. यामध्ये शिवतेर्थ गडकिल्ले धारातीर्थ मोहिमेतील १६ धारकरी जखमी झाले. सुदैवाने कोणतीही जीवित हानी झाली नाही.

सांगली जिल्ह्यातील पलूस तालुक्यांत अंकलखोप गावात राहणारे गणेश गायकवाड, अक्षय पाटील, सत्यम पुजारी, ओमकार खामकर, यश उपाध्ये, सागर हल्लोळी, पवन कुमार जाधव, योगेश खामकर, अवधूत कुलकर्णी, कुणाल उपाध्ये, पवन साळुंखे, ओम कोळी, अविष्कार शिंदे, संकेत जाधव, रोहन तलवार, विशंभर जोशी सांगली जिल्ह्यातील अंकलखोपचे १६ धारकरी पिकअप जीपने श्री शिवछत्रपती प्रतिष्ठान हिंदुस्थानच्या श्रीमान शिवराजधानी रायगड धारातिर्थ गडकोट मोहिमेत सहभागी होण्यासाठी पोलादपूर तालुक्यातील उमरठ येथे निघाले होते.

पोलादपूर तालुक्यातील आंबेनळी घाटामध्ये प्रतापगड बाजूने येताना तीव्र वळण उताराच्या रस्त्यावर कुंभळवणे फाटयालगत त्यांच्या पिकअप जीपने (नंबरप्लेटव एअरटेल स्पीकर लावले आहे) रस्त्याच्या संरक्षक कठडयाला धडक दिली आणि पिकअप जीप रस्त्यालगत कलंडली.

याठिकाणी असलेल्या छोटया टपरीवजा हॉटेलमधील कापडे खुर्दचे उपसरपंच तानाजी जाधव यांना मध्यरात्रीनंतर पिकअपजीपच्या अपघाताचा आवाज ऐकू आला आणि आवाजाच्या दिशेने त्यांनी सहकाऱ्यांसोबत मदतीसाठी धाव घेतली. या वेळी एक धारकरी गंभीर जखमी असल्याने त्यांच्या जखमेतून रस्त्यावर रक्ताची धार वाहात होती तर अन्य धारकऱ्यांना पाठ, डोके, पाय, मांडी व छातीवर दुखापत व किरकोळ जखमा झाल्या होत्या.

या वेळी तातडीने ग्रामस्थांनी वाहनांनी तसेच ॲम्ब्युलन्सने पोलादपूर ग्रामीण रुग्णालयात पाठविले. डॉ. सलागरे व अन्य परिचारिकांनी तातडीने उपचार करून अपघातग्रस्तांना महाड ट्रॉमा केअर सेंटर आणि माणगाव उपजिल्हा रुग्णालयात पुढील उपचारासाठी पाठविले. महाड ट्रॉमा केअर सेंटरमध्ये रोहयो मंत्री ना. भरत गोगावले यांनी रुग्णांची आस्थापुर्वक चौकशी केली.

## निवडक

### मेडिकल स्टोअरमध्ये चोरी

**कर्जत :** तालुक्यातील नेरळ पोलीस ठाणे हद्दीत ७ फेब्रुवारी २०२५रोजी साई मंदीर नेरळ येथील जयभवानी डे अँड नाईट मेडीकल स्टोअर बंद दुकानावरील सिमेंटचा पत्रा कोणीतरी अज्ञात चोरट्याने किंवा चोरट्यांनी तोडून त्या वाटे आतमध्ये प्रवेश करून सिमेंट पत्र्याला खालच्या बाजुला असलेली लोखंडी जाळी कशानेतरी कापून मेडीकल दुकानामध्ये प्रवेश करून मेडीकल काउंटरजवळ असलेल्या टेबलमधील ड्रावरमधील १५,७०० रुपये रकमेची चोरी केली. याबाबत नेरळ पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलीस हवालदार सचिन वाघमारे हे करीत आहेत.

### मुलीच्या पालकांचा शोध

**पनवेल :** एका तीन ते चार वर्षीय मुलीला रस्त्यावर



सोडून दिल्याने ती रडत असताना पनवेल रेल्वे फलाट क्रमांक ३ येथे त्यावेळी कर्तव्यावरील होमगार्डने मुलीस ताब्यात घेऊन पोलीस ठाण्यात आणले. मुलगी शिवानी नाव सांगत असून तिचा रंग गहुवर्ण आहे. अंगात निळा टी शर्ट आणि ब्राऊन फुल पॅन्ट घातलेली आहे. मुलीचे दोन्ही पाय गुडघ्यात वाकडे आहेत. या मुलीच्या आई वडील किंवा देखभाल करणाऱ्या व्यक्तीचा शोध पनवेल रेल्वे पोलीस घेत आहेत. कोणाला याबाबत माहिती असल्यास त्यांनी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# आमदार रविशेठ पाटील यांचा 'संवाद चिमुकल्यांशी'

**पेण : प्रतिनिधी**



आदिवासी विकास विभागांर्तगत महाराष्ट्रातील सर्व शासकिय आश्रमशाळांना निवासी भेट देणेबाबत कार्यक्रम आयोजन करण्यासंदर्भात आदिवासी विकास विभाग यांनी पेण प्रकल्पांतर्गत शासकिय माध्यमिक आश्रमशाळा सावरसई पेण या आश्रमशाळेस संवाद चिमुकल्यांशी या अभियानांतर्गत आमदार रविशेठ पाटील, आदिवासी विभाग ठाणे अप्पर आयुक्त दीपककुमार मीना, उपआयुक्त प्रदीप पोळ व पेण कार्यालय अधिक्षक आनंद पाटील यांनी या कार्यक्रमात विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

या वेळी आमदार रविशेठ पाटील यांनी आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांना भविष्यात पुढे जाण्यासाठी मोठी स्वप्ने पाहण्याबाबत प्रेरीत केले व आपल्या गावाचे व समाजाचे नाव कसे मोठे होईल याबाबत प्रबोधन व मार्गदर्शन केले.

अप्पर आयुक्त दीपककुमार मीना यांनी आदिवासी विभागामार्फत दहावीनंतर पुढील शिक्षणासाठी कोणकोणत्या सोयी-सुविधा उपलब्ध आहेत याबाबत मार्गदर्शन केले तसेच विविध क्षेत्रातील तज्ञ मार्गदर्शक यांना बोलावून विद्यार्थ्यांना करिअर गाईडन्स देणेबाबत सुचित केले. त्यानुसार शाळेचे (प्रभारी) मुख्याध्यापक एस. आर. ठाकूर यांनी या कार्यक्रमास उपस्थित विद्यार्थ्यांना दहावीनंतर कोणकोणते पर्याय उपलब्ध असतात याबाबत मार्गदर्शन केले.

हा कार्यक्रम प्रकल्प अधिकारी आत्मारामजी धाबे यांच्या मार्गदर्शनाखाली झाला. आभार स्त्री अधिक्षिका माने मॅडम यांनी केले. या वेळी अध्पर आयुक्त यांनी विद्यार्थ्यांनी मांडलेल्या समस्येच्या अनुषंगाने शालेय परिसराची पाहणी केली असता नवीन इमारतीपासून ते बहुउद्देशीय हॉलपर्यंतचा अंतर्गत रस्त्याचा प्रस्ताव मंजुरीसाठी सादर करणेबाबत निर्देश दिले.

# प्रकाश देसाई यांचा आज भाजप प्रवेश सोहळा

**पाली : प्रतिनिधी**



शिवसेना शिंदे गटाचे माजी रायगड जिल्हा संपर्क प्रमुख प्रकाश देसाई यांनी शिवसेनेला अखेरचा जय महाराष्ट्र केला. देसाई यांनी थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांची रायगडच्या प्रमुख पदाधिकारी यांच्या समवेत भेट घेतली, व भाजप पक्षात दाखल होण्यावर शिक्कामोर्तब केले.

९ फेब्रुवारी २०२५ रोजी भाजपचे ज्येष्ठ नेते, पदाधिकारी यांच्या उपस्थितीत पालीत भव्य पक्ष प्रवेश सोहळा पार पडणार असून या वेळी प्रकाश देसाई यांचे असंख्य समर्थक देखील भाजपचे कमळ हाती घेणार आहेत.

प्रकाश देसाई हे मागील तीन दशकाहून अधिक काळ सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, कला क्रीडा क्षेत्रात कार्यरत आहेत. या सर्व क्षेत्रात त्यांनी आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवला असून ते उल्लेखनीय कामगिरी करीत आहेत. सर्वसामान्य जनतेमध्येदेखील त्यांचा दांडगा जनसंपर्क आहे.

या सर्व बाबींचा भाजपला आगामी काळात पक्ष संघटना मजबूत करण्यात व पक्ष तळागाळात पोहचविण्यात फायदाच होईल, असे राजकीय जाणकारांचे मत आहे.

या पक्ष प्रवेश कार्यक्रमास भाजप महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, खासदार धैर्यशील पाटील, आमदार रवींद्र पाटील, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, आमदार निरंजन डावखरे आदींसह प्रमुख पदाधिकारी उपस्थित राहणार असल्याची माहिती भाजप सुधागड तालुका अध्यक्ष श्रीकांत ठोंबरे यांनी दिली.

सद्यस्थितीत रायगड जिल्ह्यात भाजप पक्ष संघटनेकडे विविध पक्षाचे प्रमुख नेते, पदाधिकारी आकर्षित होताना दिसत आहेत.

# पनवेल महापालिकेतर्फे काव्यसंमेलन उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



नदीचे कुणीच ऐकना, शेवटी तिने धरणात जलसमाधी घेतली अशा उपरोधाच्या माध्यमातून गंभीर समाजचिंतन करत हास्य फुलवणारे लागणारे महाराष्ट्राचे दिग्गज कवि अशोक नायगांवकर यांनी आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात आपल्या कवितेच्या माध्यमातून हास्य फवारे उडवून दिले.

मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याच्या पार्श्वभूमीवर पनवेल महापालिकेच्या वतीने जागर मराठीचा-जल्लोष कवितेचा कार्यक्रमाचे, आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली सहा फेब्रुवारीला हा कार्यक्रम झाला. या वेळी ते बोलत होते.

या वेळी उपायुक्त कैलास गावडे, उपायुक्त डॉ.वैभव विधाते, उपायुक्त प्रसेनजित कारलेकर, मुख्य लेखाधिकारी मंगेश गावडे, मुख्य लेखा परिक्षक निलेश नलावडे, सहाय्यक आयुक्त स्वरूप खारगे, सहाय्यक आयुक्त डॉ. रूपाली माने उपस्थित होते. तसेच यावेळी अशोक नायगावकर यांनी महिलांच्या सक्षमीकरणावर कार्यक्षमतेची प्रशंसा करत 'मिळवती', भाकर, शाकाहार अशा अनेक कविता सादर करून नाट्यगृहात सर्वत्र हाशा पसरवला.

या वेळी कवी प्रशांत मोरे यांनी आपल्या खड्या आवाजात त्यांची फुफाटा कविता सादर केली तसेच त्यांची प्रसिध्द कविता मैना व परीस परीस सादर केली. तसेच डॉ. विजय देशमुख यांनी आपली विविध कवितांच्या माध्यमातून समाजामधील वास्तवांवर प्रकाश झोत टाकला.

कवयित्री स्मिता दातार यांनीही कविता सादर केल्या. तसेच कवियित्री मृणाल केळकर यांनी गेय कविता सादर केल्या. तसेच कवियित्री महानंदा मोहिते यांनी आपल्या अंगण कवितेने सर्वांना मंत्रमुग्ध केले तसेच या वेळी त्यांनी आपल्या बाई, महाराज कविता सादर केल्या.

प्रास्ताविक उपायुक्त कैलास गावडे यांनी केलेसमारोप मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ. राजू पाटोदकर यांनी केला.

पनवेल महापालिका अंतर्गत अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी कविता वाचन' स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेला अधिकारी व कर्मचाऱ्यांचे उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला.

# लग्नाचे आमिष दाखवून महिलेची फसवणूक

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत पोलिस ठाण्याचा हद्दीतील महिलेला लग्नाचे आमिष दाखवून तिला आठ लाख रुपयाची फसवणूक केली आहे, महिलेने कर्जत पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून अधिक तपास करीत आहेत.

कर्जत पोलिस ठाण्याच्या हद्दीत येथील एका व्यक्तीने (रा. नाशिक) महिला (रा. भिसेगाव, कर्जत) यांचेशी लग्न करणार असल्याचे सांगून स्टेट बँक ऑफ इंडीया, बँक ऑफ बडोदा व एचडीएफसी या बँक खात्यातील ७,००,००० रुपये रक्कम फोन पे व जी पे ॲपद्वारे त्याच्या स्वत:च्या ॲक्सीस बँक खात्यात पाठवुन ९०,००० रुपये रोख घेतले, असे एकूण सात लाख ९० हजार रुपये परत करणार नाही असे सांगून त्याने महिलेची फसवणुक केली.

याबाबत कर्जत पोलीस ठाणे त्या महिलेने तक्रार दाखल केली असून कर्जत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलीस अधिकारी कीर्तीकुमार गायकवाड हे करीत आहेत.




**धाराशिव : दिल्ली विधानसभेमध्ये तब्बल २७ वर्षानंतर आपच्या १३ वर्षांच्या साम्राज्याला सुरुंग लावत भाजपने दणदणीत विजय मिळवला आहे. या विजयाबद्दल महाराष्ट्र विधान परिषदेतील भाजपचे आमदार विक्रांत पाटील यांनी तुळजापूर येथे आनंद व्यक्त करून जल्लोष साजरा केला. या वेळी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.**

पान १ वरुन

## कळंबोलीत आज कुस्त्यांचा आखाडा

कुस्ती स्पर्धेतील महिला ३५, ४० व ४५ किलो वजनाखालील गटातील प्रत्येक विजेतीला एक हजार रुपये व उपविजेतीस ५०० रुपये, ५० किलो खालील गटातील विजेतीला १५०० रुपये व उपविजेतीस एक हजार रुपये, ५५ किलो वजनाखालील गटातील विजेतीला दोन हजार रुपये व उपविजेतीस १५०० रुपये आणि ५७ ते ७६ किलो वजनाखालील गटातील विजेतीस १० हजार रुपये व नमो केसरी मानाची गदा, द्वितीय क्रमांकाला पाच हजार रुपये तर तृतीय क्रमांकाला तीन हजार रुपये, १७ वर्षाखालील मुले गटातील ३०, ३५, ४० व ४५ किलो वजनाखालील गटातील प्रथम क्रमांकास प्रत्येकी एक हजार रुपये व द्वितीय क्रमांकाला ५०० रुपये, ५० व ५५ किलो खालील गटातील प्रथम क्रमांकाला प्रत्येकी १५०० रुपये द्वितीय क्रमांकास प्रत्येकी एक हजार रुपये बक्षीस आहे. ६०, ६५ आणि ७० किलो वजनाखालील गटातील प्रथम क्रमांकास अनुक्रमे दोन हजार रुपये, तीन हजार रुपये आणि पाच हजार रुपये, द्वितीय क्रमांकास अनुक्रमे १५००, दोन हजार आणि तीन हजार रुपये, वरिष्ठ मुले ५० ते ६० किलो वजनाखालील गटातील प्रथम क्रमांकाला तीन हजार रुपये, द्वितीय दोन हजार रुपये बक्षीस आहे. ६० ते ७० किलो वजनाखालील गटातील प्रथम क्रमांकाला पाच हजार रुपये, द्वितीय क्रमांकास तीन हजार रुपये, ७० ते ७९ किलो वजनाखालील गटातील प्रथम क्रमांकाला पाच हजार रुपये, द्वितीय तीन हजार रुपये तसेच ७९ ते १२५ किलो वजनाखालील गटातील प्रथम क्रमांकाला १० हजार रुपये व नमो केसरी मानाची गदा, द्वितीय क्रमांकास पाच हजार रुपये व तृतीय क्रमांकाला तीन हजार रुपये अशी कुस्ती स्पर्धेत एकूण आठ लाख ५१ हजार रुपयांची बक्षिसे आहेत.

मानाच्या अशा या कुस्ती दंगलींचा कुस्तीप्रेमींनी लाभ घ्यावा, असे आवाहन स्पर्धेचे संयोजक कळंबोली भाजप तसेच पनवेल महापालिकेचे माजी स्थायी समिती सभापती अमर पाटील यांनी केले आहे.

# टोल सवलतीसाठी भाजपचे निवेदन

**खालापूर : रामप्रहर वृत्त**



मुंबई-पुणे एक्सप्रेस हायवे खालापूर सावरोली टोल नाक्यावरून असंख्य वाहक हे स्थानिक असून त्यांना तिथे टोल सवलत मिळत नाही. खालापूर तालुका भाजप युवा मोर्चा आक्रमक होऊन खालापूर सावरोली टोल व्यवस्थापनाला निवेदन देण्यात आले. स्थानिक वाहनांना टोल सवलत मिळायलाच हवी हया अशी भूमिका भाजप युवा मोर्चा खालापूर तालुका अध्यक्ष नागेश पाटील यांनी आक्रमकपणे भूमिका व्यक्त केली.


या वेळी टोलनाका व्यवस्थापनासोबत सकारात्मक चर्चा झाली. वरिष्ठांसोबत चर्चा करून योग्य तो निर्णय लवकर देऊ असे टोलनाका व्यवस्थापनाने सांगितले.

या वेळी भाजप खालापूर मंडळ अध्यक्ष सनी यादव, जिहा उपाध्यक्ष विठ्ठल मोरे, माजी सभापती नरेश पाटील, युवा मोर्चा कर्जत विधानसभा संयोजक प्रसाद पाटील, खालापूर तालुका सरचिटणीस रवींद्र पाटील, महिला मोर्चा तालुका अध्यक्षा सुजाताताई दळवी, युवा मोर्चा तालुका अध्यक्ष नागेश पाटील, हरीभाऊ जाधव, विशाल लोते, ज्ञानेश्वर पारांगे, दत्ताराम पाटील, लव्हेश कर्णूक, राहुल कडव, रोनित म्हात्रे, दर्शन यादव, मोहन घाडगे आदी उपस्थित होते.

## दुखवटा

### पंढरीनाथ सावंत

**मुंबई :** ज्येष्ठ पत्रकार, मार्मिकचे माजी कार्यकारी संपादक



पंढरीनाथ सावंत यांचे शनिवारी (दि.८) पहाटे त्यांच्या राहत्या घरी झोपेतच निधन झाले. वयाच्या ९१ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. माहिती व जनसंपर्क महासंचालनालय मंत्रालय यांचा लोकमान्य टिळक जीवनगौरव पुरस्कार तसेच मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघाचा कृ. पां. सामक जीवनगौरव पुरस्काराने पंढरीनाथ सावंत यांना सन्मानित करण्यात आलेय.

# राज्य सरकारकडून विकासकामांसाठी निधी आणणार -आमदार महेश बालदी

## जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना साहित्यवाटप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राज्य सरकारकडून विकास कामांना निधी आणण्यासाठी कुठेही कमी पडणार नाही अशी ग्वाही उरणचे आमदार महेश बालदी यांनी ओवळे येथे शैक्षणिक साहित्यवाटपावेळी केले तसेच लोकनेते दि.बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळामध्ये स्थानिकांनाचा प्राधान्य दिले जाईल, असा विश्वास व्यक्त केला.



उरणचे आमदार महेश बालदी यांच्या रायगड जिल्हा गौण खनिज प्रतिष्ठान अंतर्गत उरण मतदार संघातील ५१ ग्रामपंचायतीमधील शाळांना शैक्षणिक साहित्य वाटप ओवळे येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत आमदार महेश बालदी यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम झाला.

या वेळी २० ग्रामपंचायत हद्दतीतील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना संगणकिय डिजिटल लॉबच्या माध्यामतून प्रत्येक शाळेला कॉम्प्युटर लॉब आणि डिजीटल क्लासरुम आणि सुरक्षेसाठी सीसीटीव्ही यंत्रणा, २३ जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना ८३ ऑल इन वन डिजीटल टिचींग प्रोजेक्टर, आणि आठ जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना २०० टॅबचे वाटप आमदार महेश बालदी यांच्यासह उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

या वेळी गटविकास अधिकारी समीर वाठारकर, गट शिक्षण अधिकारी मोहिते, नंदराज मुंगाजी, जिल्हा चिटणीस रुपेश धुमाळ, सरपंच सुरेश गायकवाड, उपसरपंच धिरज पाटील, मदन आहिर, गजानन पाटील, सुनील पाटील, मनखुश नाईक, रणजीत म्हात्रे, रोशन जितेकर, सदन डाऊर, मिथुन जितेकर, राजेंद्र सदावर्ते, प्रगती गायकवाड, सुवर्णा म्हात्रे, आनंदी पाटील, सचिन पाटील, महेश गव्हाणकर, प्रकाश वाजेकर, बळीराम गायकवाड, बबन म्हात्रे, विष्णू घोपरकर, स्नेहल पाटील, सुनील पाटील, किरण पाटील, राजेंद्र सदावर्ते, आनंदी पाटील, सुप्रिया मुंगाजी, मिथुन जितेकर, प्रकाश वाजेकर, बळीराम गायकवाड यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते.






**पनवेल : उलवे सेक्टर १८ व १९मध्ये जाणारा रस्ता उंची जास्त असल्याने सोसायटीला त्रास होत आहे. भाजप पदाधिकाऱ्यांनी या संदर्भात आमदार महेश बालदी यांना सांगून पत्र दिले. त्यांच्या सांगण्यावरून सिडको, टीआयपीएल इंजिनियर व प्लॅटिनम सोसायटी एकत्रित बैठक घेण्यात आली. या वेळी भाजप तसेच सोसायटी पदाधिकारी उपस्थित होते.**

## निवडक

### खैरणे गावातून महिला बेपत्ता



**पनवेल :** राहत्या घरातून कोणास काही एक न सांगता एक महिला कुठेतरी निघून गेल्याने ती हरविल्याची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. फराणा खातून अजारुद्दीन मीर (१९ रा.खैरणे गाव) असे या महिलेचे नाव असून रंग गोरा, चेहरा उभट, डोळे काळे, नाक सरळ, केस लांब काळे, बांधा मध्यम, उंची ४ फुट २ इंच असून अंगात काळा सलवार कुडता व पायात चप्पल आहे. तिला हिंदी व बंगाली भाषा अवगत आहे. तिच्या डाव्या हाताच्या खांद्यावर व पाठीवर जुनी जखम आहे. या महिलेबाबत कोणाला माहिती असल्यास त्यांनी पनवेल तालुका पोलीस ठाणे (०२२-२७४५२४४४) किंवा पो.हवा.अमर भालसिंग यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### गांजा सेवन केल्याप्रकरणी कारवाई

**पनवेल :** गांजा हा अंमली पदार्थ जवळ बाळगून त्याचे सेवन करीत असताना मिळून आल्याने संबंधित इसमाविरोधात पनवेल तालुका पोलिसांनी कारवाई केली आहे. हबीबुल्ला मुबारक गाझी (२५ रा.खैरणे) हा गांजा हा अंमलीपदार्थ जवळ बाळगून त्याचे सिगारेटच्या तंबाखूमध्ये मिश्रण करून सेवन करीत असल्याचे आढळून आल्याने त्याच्या विरोधात गुन्हा पनवेल तालुका पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आला आहे.

### रिक्षाची ज्येष्ठ नागरिकास धडक

**पनवेल :** राहत्या घरी जाण्याकरिता रोड ओलांडीत असताना भरधाव वेगात आलेल्या रिक्षाने ज्येष्ठ नागरिकास धडक दिल्याने झालेल्या अपघातात ते जखमी झाल्याची घटना पनवेल तालुक्यातील पोयंजे बालाजी पेट्रोल पंपासमोर घडली आहे. राजू योहानान (७१ रा.पालीदेवद) हे रस्ता ओलांडीत असताना पुणे बाजूकडून पनवेलच्या दिशेने जाणाऱ्या रिक्षाने त्यांना धडक दिल्याने झालेल्या अपघातात राजू योहानान हे गंभीररित्या जखमी झाले आहेत व त्यांना उपचारार्थ रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या अपघाताची नोंद पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### सोन्याचे दागिने, रोख रकमेची चोरी

**पनवेल :** घरात प्रवेश करून वसीम मन्सूर पटेल याने तीन तोळे वजनाचा सोन्याच्या दागिना आणि वीस हजार रुपये चोरून नेल्याप्रकरणी तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. झकरिया पटेल हे तळोजा येथे राहत असून त्यांना रात्री साडेतीन च्या सुमारास जाग आली. या वेळी घराचा दरवाजा व बेडरूमची खिडकी उघडी दिसली. कपाटात सोन्याचा दागिने आणि रोख रक्कम दिसून आली नाही. त्यावेळी बेडरूमच्या खिडकीजवळ एक पाकीट घडलेले दिसले. त्यात गावातील वसीम पटेल या नावाचे पॅन कार्ड होते. तळोजा पोलीस ठाण्यात त्याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

## शिवजयंतीसाठी उद्या नियोजन बैठक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या माध्यमातून लोकसहभागातून छत्रपती शिवाजी महाराज जयंती मोठ्या उत्साहात सालाबाद प्रमाणे साजरी करण्यात येणार आहे. यासाठीची विचार विनीमय बैठक सोमवारी (दि.१०) दुपारी ०४.३०आद्यक्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाटयगृह येथे आयोजित करण्यात आली आहे.

या बैठकीसाठी पनवेल शहरातील छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सव मंडळे, विविध शैक्षणिक व इतर संस्था, ट्रस्ट, कामगार संघटना, नागरिक यांनी उपस्थित रहावे, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले.

बुधवार १९ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती महापालिकेच्या माध्यमातून लोकसहभागातून साजरी करण्यात येणार आहे. यासाठी विचार विनिमय करण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सव मंडळाचे पदाधिकारी,उत्सव समिती सदस्य व शिवजयंती उत्सव, मंडळांचे अध्यक्ष, विविध संस्थांचे पदाधिकारी व कार्यकर्ते, मनपातील माजी पदाधिकारी, माजी सभागृह नेते, माजी विरोधी पक्षनेते, माजी नगरसेवक, शाळेचे मुख्याध्यापक, वीज मंडळाचे कार्यकारी अभियंता, वाहतुक शाखेचे अधिकारी, पोलिस निरिक्षक, पोलीस अधिकारी, तसेच पनवेल नगरी मधील नागरीक आदी सर्वांची बैठक सोमवार दिनांक १० फेब्रुवारी रोजी दुपारी ०४.३० वाजता महापालिकेच्या आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाटयगृह येथे आयोजित करण्यात आलेली आहे.

या बैठकीस छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सव मंडळे, विविध शैक्षणिक व इतर संस्था, ट्रस्ट, कामगार संघटना, नागरिक यांनी उपस्थित रहावे असे उपस्थित रहावे, असे आवाहन महापालिकेच्या वतीने आयुक्त मंगेश चितळे यांनी केले आहे.

## रामशेठ ठाकूर महाविद्यालयात वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात सोमवारी (दि.१०) सकाळी ११ वाजता पारितोषिक वितरण समारंभाचे आयोजन केले आहे. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून सन्माननीय डॉ. मृदुल निळे (राज्यशास्त्र विभाग प्रमुख मुंबई विद्यापीठ) हे उपस्थित राहणार आहेत.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे सन्माननीय सचिव डॉ. सिद्धेश्वर गडदे तसेच दीपक शिंदे व प्रभाकर जोशी (सीडीसी मेंबर, रामशेठ ठाकूर महाविद्यालय खारघर) या कार्यक्रमासाठी उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमांमध्ये महाविद्यालयातील सर्व शाखेतील प्रथम द्वितीय व तृतीय वर्षाच्या विद्यार्थी व विद्यार्थिनींनी मिळवलेल्या वेगवेगळ्या शैक्षणिक उपक्रमांमधील यशाबद्दल प्रमुख पाहुण्यांच्या व अध्यक्षांच्या हस्ते प्रशस्तीपत्रक देऊन त्यांचा गुण गौरव करण्यात येणार आहे.

महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे व प्रा.डॉ. नीलम लोहकरे (समन्वयक, परीक्षा समिती), प्रा. प्रवर शर्मा (समन्वयक' स्टुडन्ट वेल्फेअर समिती) यांनी या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभासाठी विद्यार्थ्यांना तसेच त्यांच्या पालकांना महाविद्यालयाच्यावतीने उपस्थित राहण्याची विनंती केली आहे. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी महाविद्यालयातील व शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी भरपूर मेहनत घेत आहेत.

## एमएनएम विद्यालयात दहावीच्या विद्यार्थ्यांचे शुभचिंतन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण संस्थेच्या उलवे रोड येथील मोरू नारायण म्हात्रे विद्यालय व तुकाराम नारायण घरात ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्समधील इयत्ता दहावी बोर्ड परीक्षा फेब्रुवारी २०२५ ला प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शुभचिंतन सोहळा आयोजित करण्यात आला.



या वेळी शाळेच्या मुख्याध्यापिका प्रणिता गोळे यांनी विद्यार्थ्यांना नियमितपणा, मुद्देसूद मांडणी व मुक्त वातावरणात परीक्षेला सामोरे जाऊ उत्तुंग यश मिळवून विद्यालयाच्या निकालाची यशस्वी परंपरा कायम ठेवावी अशा शुभेच्छा दिल्या. शाळेचे समन्वयक राहुल म्हात्रे सर यांनी अभ्यासाचे वेळापत्रक, नियोजन ,वक्तशीरपणा आणि सखोल वाचन या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून बोर्डाच्या परीक्षेमध्ये भरघोस यश मिळवण्याचा शुभेच्छा दिल्या.

शाळेचे पर्यवेक्षक अरुण जोशी सर यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. इयत्ता दहावी मधील मेघराज पाधी, श्रावणी म्हात्रे, अनघा घारे, श्रावणी गव्हाणे या विद्यार्थिनींनी आपली भावपूर्ण मनोगते व्यक्त करत शिक्षकांचे आभार मानले.

## स्वच्छता मोहिमेंतर्गत श्रमदान

**पनवेल : वार्ताहर**

महाराष्ट्र शासनाचे शासन निर्णय आणि शंभर दिवस कृती आराखडा अनुषंगाने पोलीस आयुक्त नवी मुंबई यांचे आदेश व निर्देशाप्रमाणे पनवेल तालुका पोलीस ठाणे येथे नुकतेच वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजानन घाडगे यांच्यासह सर्व अधिकारी व अंमलदार यांनी श्रमदान करून पोलीस ठाणे आणि परिसर स्वच्छता मोहिमेंतर्गत श्रमदान करून स्वच्छ केला.

याचप्रमाणे पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजानन घाडगे यांनी माहिती दिली की वरील मोहिमे च्या अनुषंगाने पोलीस ठाणे स्वच्छता याकरिता श्री साई गणेश इंटरप्राईजेस नवीन पनवेल या संस्थेकडून पोलीस ठाणे येथे दैनंदिन व साप्ताहिक स्वच्छता सेवा पुरवण्यात येणार आहे. याबाबत वरील संस्थेकडून पोलीस ठाण्यास लेखी कळविण्यात आलेले आहे. त्याचप्रमाणे स्वच्छते मोहिमेसह नागरिकांना सौजन्याची वागणूक तसेच त्यांच्या तक्रारीचे तात्काळ निराकरण करण्याचा प्रामाणिक प्रयत्न पोलिसांकडून करण्यात येणार आहेत.

## केएलई महाविद्यालयात हवामान बदल साक्षरता कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या वतीने राबविण्यात येत आहे. या अंतर्गत आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली गुरुवारी (दि.६) केएलई महाविद्यालयात 'हवामान बदल साक्षरता' कार्यक्रम घेण्यात आला.

माझी वसुंधरा अभियान ५.० अंतर्गत पर्यावरणाचे महत्व शालेय विद्यार्थ्यांना समजावे यासाठी पर्यावरण तास हा उपक्रम उपायुक्त डॉ. वैभव विधाते यांच्या सूचनेनुसार महापालिका कार्यक्षेत्रातील महाविद्यालामध्ये, विद्यालयांमध्ये राबविण्यात येत आहे. या अंतर्गत आकाश, जल, वायू, भूमी, अग्नि या माझी वसुंधरा अभियानातील महत्त्वाच्या घटकांनूसार कृती कार्यक्रम, शिबिरे, व्याख्याने, वक्तृत्व स्पर्धा, पोस्टर स्पर्धा, वृक्षारोपण, प्रश्नमंजूषा, चर्चासत्र, गटचर्चा, विविध खेळांचे आयोजन करण्यात येत आहेत.

के एल ई महाविद्यालयात महापालिकेच्यावतीने 'पर्यावरण तास' या उपक्रमांतर्गत 'हवामान बदल साक्षरता' याविषयावरती व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. तसेच 'वनतोडीचा हवामान बदलावर होणारा परिणाम, शून्य कचरा जीवनशैली प्राप्त करू शकतो ?, पर्यावरण समस्यांवर तंत्रज्ञानाची भूमिका, पर्यावरण संरक्षणात वैयक्तिक आणि सामूहिक जबाबदारी व पाणी संवर्धन: शाश्वत भविष्यसाठी उपाययोजना या विषयांवरती गट चर्चेचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी या गट चर्चेमध्ये उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला तसेच या वेळी विद्यार्थ्यांनी माझी वसुंधराची शपथ घेतली.

या वेळी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. विजय मेंढुळकर, एनएसएस चे कार्यक्रम अधिकारी शितल घार्गे, विशाल छावरिया, एनएसएसचे सदस्य शुभांगी सपकाळ, माधवी जोशी, रिया मेहतर यांचे सहकार्य लाभले.

## संगीत सभेत उमेश चौधरींच्या गायनाने रसिकांना मंत्रमुग्ध

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जगविख्यात तबलावादक पंडित सदाशिव पवार यांच्या स्मृतिदिनानिमित्त सदाशिव अकॅडमी ऑफ म्युझिक यांच्या वतीने संपन्न झालेल्या एक दिवसीय संगीत सभेत रायगडचे सुपूत्र पं. उमेश चौधरी यांनी आपल्या गायन कलेतून रसिकांना मंत्रमुग्ध केले. या समारंभाला रसिकांचा उत्स्फूर्त लाभला. हा कार्यक्रम अत्यंत सुरेल आणि भक्तिरसात न्हाहून गेला होता.



डोंबिवली येथील गणपती मंदिर वक्रतुंड सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाच्या प्रारंभी कै. पं. सदाशिव पवार यांच्या प्रतिमेस उपस्थित मान्यवरांनी पुष्पमाला अर्पण करून अभिवादन केले. त्यानंतर रायगड भूषण पं. उमेश चौधरी यांच्या हाती कार्यक्रमाची सूत्र देण्यात आली. त्यांनी 'राग पुरिया धनाश्री' मधील बडा खयाल लयकारी अंगाने सुसूत्रप्रमाणे राग विस्तारित केला. त्यानंतर छोटा खयाल व तराणा विशेष तयारीने पेश केला. व मैफलीच्या शेवटी भारतरत्न पं. भीमसेन जोशी यांच्या 'आता कोठे धावे मन' हा प्रसिद्ध अभंग सादर करून रसिकांची वाहवा मिळवत त्यांची मने जिंकली.

या मैफिली नंतर रसिकांना टाळी धरण्यास भाग पाडले ते म्हणजे पं. रूपक पवार यांच्या तबला सोलो वादनाने. त्यांनी ताल तीनतालमध्ये उस्ताद जाकीर हुसेन यांच्या काही बंदिशी सादर करून त्यांनीही श्रोत्यांची वाहवा मिळवली. त्यांना लेहरा साथ विनोद पडघे यांनी केली. कार्यक्रमाच्या शेवटी ज्येष्ठ गायिका डॉ. पौर्णिमा धुमाळ यांनी राग 'दुर्गा' मधील बडा आणि छोटा खयाल व राग 'बसंत' मधील फगवा ब्रिज देखन हा छोटा खयाल सादर करीत ज्ञानदेव गुरु ज्ञानदेव तारू हा सेनामहाराजांचा अभंग गाऊन श्रोते भक्तीरसात न्हाऊन निघाले. नित्यक्रमाला तबल्यावर पं. निषाद पवार व पं. विनायक नाईक तर हार्मो नियमवर मंदार दीक्षित यांनी उत्कृष्ट साथ दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचान नीता रामतीर्थे यांनी तर ध्वनी मुद्रण सुनील म्हात्रे यांच्या अनुष्का रेकॉर्डिंग स्टुडिओने केले.

## गरजूंना ब्लँकेटचे वाटप

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी येथील पाताळगंगा नदी आणि पर्यावरण संवर्धन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने रात्री उघड्यावर राहणाऱ्या गरजूंना उबदार ब्लँकेटचे वाटप करण्यात आले.

पनवेल बसस्थानक, रेल्वे स्टेशन, मोहोपाडा थांबा, कळंबोली सर्कल, मानसरोवर रेल्वे स्टेशन परिसरात उघड्यावर झोपणाऱ्या गरजूंना उबदार व दर्जेदार ब्लॅकेट व खाऊचे वाटप करण्यात आले. या वेळी १४३ ब्लॅकेटचे वाटप करण्यात आले. उघड्यावर राहणाऱ्यांना उबदार ब्लँकेट मिळाल्याने त्यांनी पाताळगंगा नदी आणि पर्यावरण संवर्धन चॅरिटेबळ ट्रस्टचे अध्यक्ष अरुण जाधव व सहकाऱ्यांचे आभार मानले. या वेळी पोलीस उपनिरीक्षक मनोज महाडीक, रोहित इंगले, दिगंबर गायकवाड उपस्थित होते.



## मोहोपाड्यातील साईबाबा मंदिरात गायत्री यज्ञ

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

मोहोपाडा रसायनी येथील श्री साईबाबा मंदिराचा २७ वा वर्धापन दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. हे कार्यक्रम श्री साईबाबा मंदिर, एचओसी कॉलनी -मोहोपाडा येथे झाले.



यानिमित्ताने भूपाळी, काकडा आरती, महामंगळ स्नान, अर्चना, आरती होऊन गायत्री (११ कुंड) यत्राचा कार्यक्रम झाला. या कार्यक्रमात रसायनी पाताळगंगा परिसरातील ग्रामपंचायत सरपंच व प्रतिष्ठितांना होमहवनासाठी बसविण्यात आले. या वेळी मुखूय गायत्री यज्ञाचा मान सरपंच उमा मुंढे व माजी सरपंच संदिप मुंढे यांना देण्यात आला. सायंकाळी मोहोपाडा ते श्री साई बाबा मंदिर श्री साई पालखी मिरवणूक पार पडली.

कार्यक्रमासाठी श्री साईबाबा सत्संग केंद्र, कार्यकारी मंडळ रसायनीचे अध्यक्ष एम.एस.मगर, उपाध्यक्ष आंबवणे, सचिव-बी. जे.कोडिलकर, उपाध्यक्ष-आरएम पोरे व इतर पदाधिकारी सदस्य यांनी अथक परिश्रम घेतले.

# आंधी @ ५० वर्ष

## वादळी, बहुचर्चित, संगीतमय आणि बरेच काही!

झूम प्रहर



दिलीप ठाकूर
चित्रपट समीक्षक

काही चित्रपट कलाकृती कितीही वर्ष सरली तरी त्या आजच्याच असतात. आजही त्यातून जुन्या चित्रपटांचे अस्तित्व व महत्व अधोरेखित होत राहते. आंधी हा चित्रपट असाच. क्लासिक व व्यावसायिक यांचा सुवर्णमध्य गाठणारा.

नाव घेताक्षणीच एकाच वेळेस अनेक गोष्टी डोळ्यासमोर येणारच. अशी अनेक चित्रपटांची ताकद आहे. राजकीय पत्रकार याकडे राजकीयपट म्हणून पाहणार, राजकीय विश्लेषक या चित्रपटावर आणीबाणीत बंदी घालण्यात आली होती याची आठवण नक्कीच करून देणार, चित्रपट माध्यमाची जाण असणारे गुलजार यांच्या कल्पक दिग्दर्शनाचं विशेष कौतुक करणार, चित्रपट रसिक याकडे राजकारणाच्या पार्श्वभूमीवरील परिपक्व (मॅच्युअर्ड) प्रेमकथा म्हणून पाहणार, संगीत शौकीन या चित्रपटातील श्रवणीय गाणी एव्हाना गुणगुणायला लागले असणारच, काहींनी ती ऐकायला घेतली असणार. फिल्मी गॉसिप्समधून विशेष रस घेणारे या चित्रपटाच्या काश्मिरमधील चित्रीकरणाच्या वेळेस झालेली एक गोष्ट रंगवून सांगणार. आंधी हा बहुचर्चित वादळी चित्रपट म्हणून कायमच ओळखला जातो.

फिल्म क्राफ्ट या निर्मिती संस्थेचे जे. ओम प्रकाश निर्मित आणि गुलजार दिग्दर्शित 'आंधी' (रिलीज १३ फेब्रुवारी १९७५ मुंबईत मेट्रो थिएटर... १४ फेब्रुवारीपासून मुंबई व उपनगरात)च्या प्रदर्शनास यशस्वी पन्नास वर्षे पूर्ण होत आहेत. कधी सरला हो इतका काळ?

१९७५ हे राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, माध्यम क्षेत्रासाठीचे अतिशय महत्त्वाचे वर्ष. अनेक घडामोडींचे वर्ष. हिंदी चित्रपटसृष्टीसाठी तर खास उल्लेखनीय वर्ष. याच वर्षाच्या जानेवारीत २४ तारखेला मुंबईत यश चोप्रा दिग्दर्शित दीवार चित्रपट पडद्यावर आला तोच प्रेक्षकांनी डोक्यावर घेतला. तो इतका आणि असा की, 'दीवार'ला पन्नास वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त दक्षिण मुंबईतील रिगल चित्रपटगृहात आयोजित केलेल्या खास खेळास मी गेलो तेव्हा मीदेखील चक्क रांगेत उभे राहून प्रवेश घेतला. 'प्रेक्षकाच्या भूमिकेत' राहिल्यानेच हाऊसफुल्ल गर्दीत आपण 'पुन्हा एकदा' दीवार एन्जॉय करू हा विश्वास मनसोक्त मनमुराद टाळ्यांनी सार्थ झाला. पन्नास वर्षापूर्वी दीवारच्याच पुढच्या शुक्रवारी म्हणजेच ३१ जानेवारी रोजी मुंबईत आयना (राजेश खन्ना व मुमताज), १४ फेब्रुवारीला गुलजार दिग्दर्शित आंधी, ३० मे रोजी सतराम रोहरा दिग्दर्शित जय संतोषी मां (याची जाहिरात माझ्या कलेक्शनमध्ये आहे) असे करत करत १५ ऑगस्टला शोले येईपर्यंत 'दीवार'ने मिनर्व्हात रौप्य महोत्सवी आठवडा पार करत मोती थिएटरमध्ये पुढचा प्रवास सुरू केला.

या सगळ्यात आंधी वेगळाच. महत्त्वाकांक्षी राजकीय नेत्या आरतीदेवी (सुचित्रा सेन) आणि त्यांचे पती जे.के. (संजीवकुमार) यांच्या नातेसंबंधाची ही गोष्ट राजकीय चित्रपट म्हणून चर्चेत राहिली. या चित्रपटात संजीवकुमार आणि सुचित्रा सेन यांच्यासह ओम शिवपुरी, मनमोहन, कमलदीप, ए.के. हनगल, हरीश, रणवीर, सी.एस. दुबे इत्यादींच्या भूमिका आहेत. 'आंधी'च्या निर्मितीतील गोष्टी एक चित्रपट ठरावा.

गुलजार हे सुचित्रा सेन नायिका असेल अशा एका वेगळ्याच पटकथेवर निर्माता सोहनलाल कंवर (पहेचान, संन्यासी इत्यादी चित्रपटांचे निर्माते व दिग्दर्शक) यांच्यासाठी चित्रपट दिग्दर्शित करणार होते, पण सुचित्रा सेनने सुचवलेले बदल गुलजार यांनी अमान्य केले व तो चित्रपट तेथेच थांबला.लेखक कमलेश्वर यांच्याकडे राजकीय नेत्या तारकेश्वरी सिन्हा यांच्या आयुष्यावर आधारित एक गोष्ट होती. गुलजार यांना ती आवडताच त्यांनी व भूषण वनमाली यांनी पटकथा लेखन केले आणि नाव ठरले आंधी.

परिचय (१९७२), कोशिश (१९७३) या चित्रपटांच्या वेळेस संजीवकुमारशी गुलजार यांचे सूर जुळल्याने आणि आता त्यांच्याच 'मौसम' मध्येही तो भूमिका साकारत असतानाच 'आंधी'साठी तोच निश्चित होताच. एखाद्या कलाकारावरचा दिग्दर्शकाचा विश्वास खूपच महत्त्वाचा असतोच. (त्यानंतर गुलजार दिग्दर्शित अंगूर, नमकीन या चित्रपटात संजीवकुमार दिसला. संजीवकुमारने नाही, पण 'मौसम'चे आवडले. १९७५ या एकाच वर्षात गुलजार दिग्दर्शित आंधी, मौसम (संजीवकुमार, शर्मिला टागोर) व खुशबू (जितेंद्र, हेमा मालिनी, फरिदा जलाल. निर्माता प्रसन्न कपूर. हा जितेंद्रचा भाऊ) असे तीन भिन्न स्वरुपातील चित्रपट प्रदर्शित झाले हे विशेषच. 'मेरे अपने'पासूनच कधीच वयाचे व भूमिकेचे बंधन ठेवले नाही). यातील मौसमची निर्मितीमागची गोष्ट वेगळीच. त्या चित्रपटाचे निर्माते मल्लिकार्जुन राव यांना कमलेश्वर यांना सांगितलेले 'आंधी'चे कथासूत्र फारसे आवडले गुलजार यांनी दिग्दर्शनात विविधता दाखवली... गुलजार यांच्या दिग्दर्शनातील चित्रपटांचे प्रगती पुस्तक एक वेगळाच आनंद.

'आंधी'तील आरती देवी या भूमिकेसाठी गुलजार यांनी आपणास विचारले होते असे खूप वर्षांनी म्हणजेच २०११ साली वैजयंतीमालाने एका मुलाखतीत भाष्य केले हा सुखद धक्काच. तोपर्यंत या गोष्टीची कधीच चर्चा झाली नव्हती. गुलजार यांनी कोलकात्यात जाऊन सुचित्रा सेनची भेट घेऊन तिचा आंधी साठी होकार मिळवला.








'आंधी'ची काही दृश्य व गाणी काश्मिरमधील सौंदर्य स्थळावर चित्रीत करण्यात आली. या चित्रीकरण सत्रात राखी गुलजार आपली अगदी छोटी मुलगी मेघना (बोस्की) हिला घेऊन काश्मिरला गेली. दिवसभराचे शूटिंग संपल्यावर रात्री श्रमपरिहार आणि त्यात बाटली फुटणे हे स्वाभाविकच. एके रात्री (म्हणे) चित्रपटात घडते अगदी तशीच गोष्ट प्रत्यक्षात घडली असे गॉसिप्स मॅगझिनमधून बरेच रंगवून रंगवून लिहिले गेले. एका रात्री (म्हणे) पार्टी संपल्यावर संजीवकुमारने सुचित्रा सेनचा हात धरला आणि तो तिला आपल्या खोलीत येण्याचा आग्रह धरत असतानाच गुलजार यांनी सुचित्रा सेनची त्याच्यापासून सुटका केली. ते सुचित्रा सेनला तिच्या रुमपर्यंत सोडावयास गेले. तेथून परतत असतानाच राखीने त्यांना पाहिले आणि तिचा काही गैरसमज झाला आणि ती प्रचंड रागावली (म्हणे). या सगळ्याचा परिणाम असा झाला की काश्मिरवरुन परतताना ते एकत्र नव्हते.

'आंधी' प्रदर्शित झाला. त्याला रसिकांचा अतिशय उत्तम प्रतिसाद मिळत होता, शंभर दिवसांचे यशही गाठले होते आणि अशातच एक बातमी पसरली. सुचित्रा सेनने साकारलेली भूमिका तात्कालिक पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्यावर बेतली आहे. गुलजार यांनी एका मुलाखतीत भाष्य केले, असे अजिबात नाही. हा गैरसमज आहे. चित्रपट लिहिताना व दिग्दर्शित करताना असा कोणताही विचार नव्हता. गुलजार यांचे म्हणणे काहीसं बाजूला पडले. अशातच गुजरात राज्यातील विधानसभा निवडणुक आली आणि त्यात या चित्रपटात एका दृश्यात आरती देवी दारू सेवन करते या दृश्याचा विरोधी पक्षाकडून वापर करण्यात आला. आणीबाणीतील ही गोष्ट. हा चित्रपट निवडणूक आचारसंहितेचा भंग करतोय या कारणास्तव या चित्रपटावर बंदी घालण्यात आली.

या चित्रपटाची गीते गुलजार यांनी लिहिली असून संगीत आर.डी. बर्मन यांचे आहे. या चित्रपटातील तेरे बिना जिंदगी से कोई (अनंतनाग), तुम आ गये हो (परीमहल गार्डन), इस मोड से जाते है (पहेलगाव) ही काश्मिरमध्ये चित्रीकरण झालेली गाणी आजही लोकप्रिय आहेत. या चित्रपटाचे मुंबईतील मेन थिएटर मेट्रो होते. 'आंधी' दिल्लीत प्रदर्शित होताना पोस्टरवर म्हटले होते, आजाद भारत की एक महान महिला नेता की कहानी..., तर हैदराबाद येथील पोस्टरवर म्हटले होते, परदे परदेखीए अपने प्रधानमंत्री को... (त्या काळात मराठी असो वा हिंदी टप्प्याटप्प्याने चित्रपट प्रदर्शित होत.)

देशात २५ जून १९७५ रोजी आणीबाणी लागू झाली आणि या चित्रपटाच्या प्रदर्शनावर बंदी आली. आजही विविध कारणास्तव आणीबाणीच्या दिवसांचा उल्लेख होता (उदा. कंगना राणावतचा इमर्जन्सी या चित्रपटाचे अलिकडेच झालेले प्रदर्शन)

यानंतर १९७७ साली म्हणजेच देशात जनता पक्षाचे सरकार स्थापन झाल्यावर 'आंधी' रि-सेन्सॉर करताना काही दृश्ये कापून तो पुन्हा प्रदर्शित करण्यात आला. आणिबाणीत गुलजार दिग्दर्शित 'आंधी' आणि डॉ. जब्बार पटेल दिग्दर्शित 'सामना' (पुण्यात रिलीज १० जानेवारी १९७५) च्या प्रदर्शनावर बंदी घालण्यात आली, यावरून बरीच चर्चा झाली.

विशेष उल्लेखनीय गोष्ट, मुंबईत १४ फेब्रुवारी १९७५ या एकाच शुक्रवारी आंधी व सामना (जानेवारीत पुणे शहरात जानेवारीत प्रभात चित्रपटगृहात प्रदर्शित झालेला सामना; त्यानंतर आता गिरगावातील सेन्ट्रल चित्रपटगृह) हे प्रदर्शित झाले आणि दोन्ही चित्रपट रिपीट रनला म्हणजेच पुन्हा प्रदर्शित झाल्यावर असे काही गाजले की आजही त्यांचा जबरदस्त ठसा उमटलाय. ते माईलस्टोन चित्रपट ठरलेत.

'आंधी'मधील गुलजार यांचा एक संवाद फारच गाजला. चित्रपटातील राजकीय पक्षाचा कारभार सांभाळणारा चंद्रसेन (ओम शिवपुरी) एका वृत्तपत्राच्या संपादकास म्हणतो, इलेक्शन के पहले आप हमारा खयाल रखिये, उसके बाद हम आपका...!

---

# समर्पित सत्यशोधक नारायण लोखंडे

सत्यशोधक कामगार नेते नारायण मेघाजी लोखंडे हे केवळ महाराष्ट्राच्या सामाजिक व कामगार चळवळीच्या इतिहासातीलच नाही तर भारताच्या व्यापक पटलावरील एक मोठे व्यक्तिमत्त्व आहे. भारताच्या ट्रेड युनियन चळवळीची मुहुर्तमेढ रोवता रोवता त्यांनी कामगार चळवळ व सामाजिक सुधारणा एकाच वेळी हातात हात घालून करता येतात याचे एक उदाहरण घालून दिले.



भारतीय औद्योगीकरणाला नुकतीच कुठे सुरुवात झाली होती असा तो १८५०-५५ चा कालखंड होता. कापड उद्योग मुंबईत मोठ्या तेजीत येऊ लागला होता. ठिकठिकाणी कापड गिरण्या उभ्या राहत होत्या. महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातून पोटापाण्यासाठी आलेले हजारो पारिव्राजक अतिशय तुटपुंज्या पगारात व निष्कृट दर्जाच्या कामाच्या जागेत रात्रंदिवस काम करीत होते व खुराड्यांसारख्या चाळींतून राहत होते.

कामाचे तास ठरलेले नव्हते. गिरणी व्यवस्थापम मन मानेल त्याप्रमाणे पगार कापत असत. कामगारांना साप्ताहिक सुट्टी नव्हती. अशा विपरित परिस्थितीत कष्ट करणाऱ्या कामगारांना त्यांच्या रास्त मागण्या मान्य व मानवी हक्काच्या सोयी सुविधा प्राप्त करून द्याव्यात तसेच कामगारांवर होणाऱ्या विविध अन्यायांना वाचा फोडावी व मिल मालकांना कामगार नियमाच्या कक्षेत आणावे यासाठी बॉम्बे मिल हॅण्डस् असोसिएशन नावाची भारतातील पहिली कामगार ट्रेड युनियन नारायण लोखंडे यांनी स्थापन केली. या युनियनमार्फत लोखंडेंनी कामगारांचे विविध लढे लढवले व त्यांचे जीवन सुसह्य करण्याचा प्रयत्न केला. अगदी फॅक्ट्री अक्ट कायदा लागू व्हावा म्हणून गिरणी मालकांबरोबर, तत्कालीन नेत्यांशीसुद्धा त्यांना भांडावे लागले होते.

त्या काळी कामगारांना त्यांची हक्काची आठवड्याची अर्थात साप्ताहिक सुटी मिळावी यासाठी लोखंडे यांनी जो ऐतिहासिक लढा दिला त्याला कामगार चळवळीच्या इतिहासात तोड नाही. सतत दहा वर्ष लढा देऊन कामगारांना तिचा लाभ त्यांनी मिळवून दिला. पुढे ही सुट्टी इतर सर्वांना लागू झाली. आज आपण सर्वजण जी रविवारची सुटी उपभोगतो तिचे जनक नारायण लोखंडे हे होते ही गोष्ट आपण लक्षात घेतली पाहिजे.

तेव्हा अस्पृश्यांप्रमाणे स्त्रियांनाही गिरणीतील विव्हिंग खात्यात काम करण्यास मनाई होती. कामगार कामगारांमध्येही अस्पृश्यता पाळली जात होती. यावर लोखंडे यांनी कामगारांचे प्रबोधन व मालकांशी संघर्ष करून हा सामाजिक भेद मिटवला आणि विव्हिंग खात्यात अस्पृश्य व शुद्र स्त्रियांना काम करण्याची परवानगी मिळवून दिली.

नारायण लोखंडे हे कामगारांच्या हितासाठी गिरणी गेटच्या आत व गेटच्या बाहेरही दक्ष राहत असत. याचे सर्वात मोठे व ऐतिहासिक उदाहरण म्हणजे १८९२ साली मुंबईत उद्णवलेल्ला दंगा हे होय. हा दंगा शमवण्यासाठी त्यांनी केलेले कार्य ऐकमेवाद्वितीय आहे.

लोखंडे व त्यांचे सहकारी हा दंगा शमवण्यासाठी अहोरात्र प्रयत्न करीत होते. या दंग्यात होरपळलेल्या दोन्ही धर्माच्या सर्वसामान्य जनतेला धीर देण्यासाठी सर्व मोहल्ले, चाळी पिंजून फिरत होते. त्यांना कामावर जाण्यासाठी प्रोत्साहीत करीत होते. दोन्ही समाजाच्या मनातील भिती काढून त्यांच्यात पूर्वीसारखाच बंधूभाव वृध्दींगत व्हावा यासाठी त्यांनी मुंबई प्रांताचे तत्कालीन कलेक्टर मि. व्हिसेंट यांच्या मदतीने व आपल्या सत्यशोधक सहकाऱ्यांच्या सहाय्याने राणीच्या बागेत ऐतिहासिक असा एकोपा मेळावा घडवून आणला.

नारायण लोखंडे यांचे भाऊ भाऊराव लोखंडे यांचे पणतू वसंत लोखंडे यांनी दिलेल्या माहितीनुसार नारायण लोखंडे यांना जन्म ठाण्याच्या तलावपाळी समोरच्या एका पारशाच्या चाळीत १३ ऑगस्ट१८४८ रोजी झाला होता. त्यांना लहानपणापासून कष्टाची व सहकाऱ्याची आवड होती.


पुढे या महान नेत्याने आपल्या आयुष्याची सुरवात जीपीओत पोस्टाच्या नोकरीतून केली होती, परंतु त्यात त्यांचे मन रमले नाही. ती नोकरी सोडून त्यांनी रेल्वेत लोकोमोटीव्ह विभागात नोकरी केली. तेथेही त्यांचे मन रमले नाही. ते सतत कामगारांच्या दुःख मुक्तीचा विचार करीत. त्यामुळे त्यांनी ही नोकरीदेखील सोडून प्रत्यक्ष कामगारांमध्ये राहता, वावरता यावे म्हणून गिरणीत स्टोअरकिपरची नोकरी पत्कारली होती. तेथे राहून, कामगारांचे दुःख व अमानवीय कष्ट पाहून त्यांचे मन तीळ तीळ तुटत असे. या कामगारांचे जीवन सुसह्य करण्यासाठी व गिरणी मालकवर्गाच्या अनिर्बंध शोषणाविरुध्द संघटित आवाज उठवण्यासाठी त्यांनी गिरणी कामगारांची संघटना बांधली व त्यांचे प्रश्न सोडवले.

कष्टकऱ्यांच्या चळवळी चालवता चालवता त्यांनी सत्यशोधकांचे प्रथम मुखपत्र दीनबंधू सुरू करून या क्षेत्रातही उल्लेखनीय कामगिरी केली. महात्मा जोतिबा फुलेंच्या सत्यशोधक चळवळीच्या इतिहासात लोखंडे यांचे जीवनकार्य हे एक सोनेरी पान आहे. ९ फेब्रुवारी २०२५ रोजी लोखंडे यांची १२८वी पुण्यतिथी आहे. त्यानिमित्ताने त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली!

–राजाराम सूर्यवंशी, बदलापूर

---

# महाकुंभ एक अद्भूत अनुभव





*२२ जानेवारी सकाळी ९ वाजता*
*ट्रिंग ट्रिंग ट्रिंग (मोबाईल रिंग)*
***Unkonwn caller - hello sir***
*मी- हा बोला*
***Unkonwn caller*- सर आप प्रयागराज आ रहे हो ना?**
*मी-क्या, कौन बोल रहे हो*
***Unknown caller - phone cut***

त्या दिवशी डोक्यात या फोननंतर महाकुंभ जाण्याचा विचार आला, बायकोला विचारले तिने होकार दिला, पण मला गिरनारला जायचे आहे आणि अशा प्रकारच्या अनेक शंका काढल्या. मग भावाला विचारले त्याने नकार दिला. आईने होकार दिला, पण यांना कोण बघेल म्हटली. मी म्हटलं त्यांना घेऊन जाऊ, पण दादांनी सुरुवातीला नकार दिला. दाजींना विचारलं. मग सगळे गाडीने टंगळमंगळ करत जाऊ असे ठरले, पण त्यांचं काही फिक्स होईना. कोणी स्पष्ट होकार देत नव्हते. एक दिवस गेला. काही निर्णय होत नव्हता, तिथली काही खबरही कळत नव्हती. शेवटी केबिनमध्ये बसलो आणि ३ तारखेचे तिकीट बुक करून टाकले. लगोलग कामाला लागलो.

महाकुंभमध्ये जाऊन शाही पद्धतीने राहायचे असे सांगून मी सगळ्यांना कॉन्फिडन्स दिला, तेवढ्यात मला एक दया येऊन सांगू लागला की मौनी अमावस्या दिवशी खूप लोकांचा जीव गेला चेंगराचेंगरीत, पण १ तारखेला झालेल्या गणेश जयंतीच्या कार्यक्रमाने सगळी भीती घालवून टाकली आणि वारकरी असल्यामुळे हा महाकुंभ मी सहज पार करणार असा मला ठाम विश्वास होता. तसंच इकडे योगायोग असे घडत होते की, आमच्या कुंभ पालयनासाठी सर्व गोष्टी व्यवस्थित मार्गी लागत आल्या होत्या. मी व बायको केवळ दोन दोन कपडे, एक भगवे वस्त्र आणि ब्रश टूथपेस्ट घेऊन निघायचे ठरले आणि आम्ही सगळ्यांचे दर्शन घेऊन निघालो. मुलगी तिच्या आजी आजोबांबरोबर, काका-काकीबरोबर येणार हे ठरल्यामुळे आम्ही निश्चिंत होऊन निघालो. त्या दिवशी रात्री भयंकर ट्रॅफिक रात्री एक तासात एअरपोर्टवर पोहचणारे आम्ही २.५ तास लागले, पण वेळेत पोहचलो आणि गणेशाचे नाव घेऊन प्रवास सुरुवात केली.

सकाळी ८ वाजता प्रयागराजच्या आभाळात असताना पायलटने कल्पना दिल्यावर महाकुंभमेळा आकाशातून पाहण्याचा जो योग आम्हाला लाभला तो अतिशय सुखकर होता. त्याने डोळ्याचे पारणे फेडले. प्रयागराज एअरपोर्ट बाहेर निघालो, ओला-गाडी शोधतच होतो, तेवढ्यात जोरात एक हाक ऐकू आली, अरे संतोष इकडे कुठे? पनवेलचे माझे डॉ. मित्र भेटले, ते महाकुंभ दर्शन करून आले होते. मग त्यांनी त्यांचाच ड्रायव्हर दिला आणि त्यांच्याच हॉटेलवर आम्ही जाऊन अंघोळ करून फ्रेश झालो. (आम्हाला संगमावर फ्रेश होऊन जायचे होते, पण पारोशा परिस्थितीत, मळलेल्या. कपड्यात संगमावर जायचे नव्हते) मग त्या हॉटेलमधून आम्ही निघालो. पुढे जात असताना अनेक कॅम्प आणि सरकारी सुविधा आणि सुशोभित रस्ते पाहत चालत निघालो, डिजिटल कुंभ हे त्यातील विशेष आकर्षण. आम्ही मात्र पुढे चालत संगमाकडे पलायन करत होतो. अचानक गंगा नदीचा अथांग परिसर एका उंचवट्यावरून दिसू लागला आणि पुढे चौकात मोठी गांगमातेची मूर्ती आणि त्यामागे नदीचे भलेमोठे पात्र ज्यात हा महाकुंभ मेळा भरला होता ते पाहून मन एकदम प्रसन्न झाले. नदीचा पसारा पाहून गंगेचं प्रयागराजमधील पात्र एवढं अवाढव्य आहे, तर गंगासागर केवढा असेल जाणवू लागले होते. पोलिसांच्या मार्गदर्शनाप्रमाणे आम्ही पुढे सरकत होतो. पुढे जांगमवाडी मठ आणि दशास्वमेध घाट आला आणि आम्ही गंगेच्या पात्रात नमस्कार करत पीपा पुलावरून प्रवेश केला. आता काहीच वेळात संगमावर अंघोळ करणार असे मला वाटू लागले. साधारण त्या वेळी सकाळचे ११.३० झाले असावेत. आम्ही संपूर्ण आखाडे पिंजून काढले. कुठे सत्संग चालू होता, कुठे किर्तनसेवा, कुठे भजन, तर कुठे भोजन चालू होते.

हे आखाडे म्हणजे पांडुरंगाच्या वारीत ज्याप्रमाणे विश्रांतीला थांबलेली दिंडी असते त्याप्रमाणे, पण अधिक भव्य आणि भगवे होते. खरे पाहता वसंतपंचमीच्या मुहूर्तामुळे ९९ टक्के साधू अमृतस्नानासाठी संगमावर पोहचले होते आणि त्यामुळे तिथे सामन्याना जाण्यास परवानगी बंद होती. आम्हाला जे काही दिसत होते ते त्यामानाने कमीच होते, पण कुठे नागा साधू, तर कुठे विद्वान साधू पाहत आम्ही चालत होतो. या साधूंकडून आशीर्वाद घेतल्याशिवाय कुंभ पूर्ण होत नाही, असे मानले जाते.

वाळूत जवळजवळ तीन तास चालत होतो, पण संगम काही नजरेस पडेना. दिसत होते ते केवळ भक्तांचे लोंढे लोंढे आणि लोंढे. प्रत्येक जण भक्तिभावाने त्या संगमात न्हाहून निघण्यासाठी पोहचला होता. एकमेकाशी कोणी बोलत नव्हते, पण एकमेकाला कोणी त्रासही देत नव्हते, उच्च-नीच, काळा-गोरा असा भेद नव्हता. सगळीकडे फक्त सनातन धर्माचा संगम दिसत होता.

गंगा नदीचे पाणी आधी खूप थंड होते. गंगेचं दर्शन घेत पाण्यात प्रवेश केला आणि हर हर महादेव अस म्हणत पाण्यात डुबकी मारण्यास सुरुवात केली. मी जसा जसा पाण्यात जात होतो तसे तसे माझे मलाच वेगळे वेगळे भासत होते. पाण्याच्या वरील शरीराचा भाग हा जणू काही सामान्य आणि पाण्यातील भाग शक्तिशाली जाणवत होता. पूर्ण डुबकी मारली आणि उभा राहिलो तसे माझे शरीर मला एका सकारात्मक ऊर्जेने भरलेले जाणवले.

महाकुंभ तसा सोपा दिसायला, पण अनुभवायला तो कोणाला कळेल किंवा कळला तरी वळेल का आणि वळला तरी फळेल का हे सांगणं कठीण, कारण यात खरचं खूप त्याग आहे, जो सगळ्यात मोठा भाग आहे. त्या दिवशी संगमावर मी जवळजवळ २१ वेळा भक्तिपूर्वक बुड्या घेतल्या आणि अंग न पुसता भगवी शाल बांधून आम्ही दोघे गंगेच्या किनारी नामस्मरण. चिंतन करत तिसऱ्या प्रहारापर्यंत बसलो.

पुढे आम्ही पुन्हा मठ शोधायला सुरुवात केली, कारण आम्हाला ज्या ठिकाणी फ्री राहायची सोय होती तिथे राहायचं नव्हतं. इतर वयोवृध्द लोकांच्या जागा अडवायच्या नव्हत्या आणि डॉक्टर मेडिकल कॅम्पच्या ठिकाणी असलेली व्हीआयपी सुविधाही आम्हाला घ्यायची नव्हती. मठ काही सापडेना. खूप थकलो होतो. रात्रीचे ९ वाजले. सगळी दुकानं बंद होऊ लागली. आम्ही नदीच्या दुसऱ्या बाजूला येऊन पोहचलो होतो आता आणि सरकारी सुविधादेखील नदीच्या पलीकडून राहिल्या होत्या. शेवटी एक माणूस दिसला. त्याने आम्हाला होम स्टे ऑप्शन सांगितलं आणि ते आवडलं. तिथेच मुक्काम केला.

सकाळी उठून बाहेर पडलो. विविध मंदिरात दर्शन घेतले. आमच्या कुंभ यात्रेतील शेवटच्या मंदिराचे दर्शन झाले होते, पण असे म्हणतात की, कुंभमेळ्यात साधुसंतांचा आशीर्वाद घ्यावा. आमची मात्र कोणत्याही साधूसंतांची भेट झाली नव्हती, पण आम्हाला चिंतन करताना मंदिरातील एक आर्मीगार्ड पाहत होता. शेवटी माझी व त्याची नजर मिळाली आणि मंदिरात एका ब्रम्हचारी साधूची, ज्यांचे ते रक्षक होते त्यांच्या दर्शनाबद्दल मी त्यांना खुणावले. त्या आर्मीगार्डने साधूंना जवळ जाऊन विचारले आणि साधूंनी त्यांना परवानगी दिली. आम्ही साधूंचे दर्शन घेतले व छान स्मितहास्य करून तेथून निघालो. अशा प्रकारे आमचा दुसरा दिवस अगदी मजेत गेला. तिसऱ्या दिवशी पहाटे ५ वाजता उठून गंगेचे दर्शन घेतले आणि परतीच्या प्रवसाला निघालो. ज्याप्रमाणे गंगेला समुद्राला भेटून गंगासागर झाल्याचा आनंद होत असावा तसाच आम्हाला गंगेत कुंभ होऊन महाकुंभ झाल्याचा आनंद मिळाला.

–डॉ. संतोष जाधव, पनवेल

# रेवदंड्यात खुलेआम मटका; गुटखा विक्री

## अवैध धंद्यांवर कारवाई करण्याची महिलांकडून मागणी

**रेवदंडा : प्रतिनिधी**

रेवदंडा पोलीस ठाणे हद्दीत बेकायदेशीर मटका अगदीच खुलेआम सुरू आहेच परंड् तर गुटखा विक्रीसुध्दा बिनधास्त असल्याचे स्पष्ट चित्र आहे.





रेवदंडा व परिसरात बेकायदेशीर मटका सुरू असून भ्रमणध्वनीच्या माध्यमातून भर रस्त्यात मटका एजंट व्यवसाय साधून आडमार्गाला उभे राहून घेतलेल्या मटकाचे आकडे भ्रमणध्वनीव्दारेच मटका मालकांना पाठवित आहेत. एकदंरीत भ्रमणध्वनीने मटका व्यवसाय पुर्वीपेक्षा तेजीत आला असून खुलेआम रस्तात उभे राहून एजंट मटका व्यवसाय चालवीत आहेत. मटका खेळून झटपट श्रीमंत होण्याच्या नादाने अनेक युवावर्ग वाममार्गाला लागले असल्याचे चित्र आहे. महिना व दिवसभरातील आर्थिक उत्पनाचा भाग मटका खेळून घालवीत असल्याने महिलावर्ग संप्तत प्रतिक्रिया व्यक्त करत आहेत. हा मटका व्यवसाय पुर्णतः बंद करावेत, अशी मागणी सर्व स्तरातून होत आहे.

गुटखा विक्रीस पुर्णतः बंदी असतानासुध्दा रेवदंडा व परिसरात बेकायदेशीपणे गुटखा विक्री केली जात आहे. गुटखा आरोग्यास अत्यंत घातक असतानासुध्दा युवावर्ग तोंडात गुटखा ठेवीत पिचकाऱ्या भर रस्त्यात फेकत असतात. ही गुटखा विक्री चोरीछुपके होत असून नेहमीच्या गिऱ्हाइकांना गुटखा माल पुरविण्यात येतो. गुटखा खरेदी करून घरात अथवा परिसरात ठेवून त्यानंतर रस्तावर बेकादेशीरपणे विक्री केली जात आहे.

गुटखाच्या मागणीसाठी गुटखा खाणारे गुटखा विक्रेत्याच्या घरीसुध्दा रात्रीचे समयी खरेदी करत असतात. आजूबाजूच्या सर्व शेजारी मंडळीना येथे गुटखा विक्री केली जाते व खरेदीसाठी रात्रीचे ग्राहक येत असतात यांची पुर्ण माहिती असते, मात्र तरीही पोलिसांनी नजरेत हे गुटखा विक्री करणारे का येत नाहीत? असा सवाल केला जातोय.

रेवदंडा व परिसरात खुलेआम मटका तसेच सर्रास गुटखा विक्री बिनधास्त सुरू आहे, या बेकायदेशीर धंद्यावर पोलिसांचा वचक केव्हा बसेल, असा प्रश्न महिला गर्व उपस्थित करत आहेत.

# विद्यार्थ्यांअभावी सुधागडातील जि.प.च्या २२ शाळांना कुलूप

## अनेक शाळांमध्ये पटसंख्या घटली

**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यातील १८१ प्राथमिक शाळांपैकी २२ शाळांना कुलूप लागले आहे. गेली २०१७ ते २०२४ या काळात विद्यार्थ्यांअभावी या शाळा बंद पडल्या आहेत. याशिवाय येथील अनेक शाळांची पटसंख्यादेखील घटली आहे. याबाबत नागरिकांनी चिंता व्यक्त केली आहे.

गावागावांमध्ये पालकांना रोजगार उपलब्ध नसल्यामुळे त्यांना रोजगारासाठी शहराकडे जाणे भाग पडत आहे आणि त्यामुळे गावातील विद्यार्थी संख्यादेखील कमी होत आहे तसेच काही गावांतील पालक वर्ग मुलांना इंग्रजी माध्यमात शिक्षण मिळावे म्हणून आपले गाव सोडून शहरांमध्ये भाड्याने घर घेऊन मुलांना शिक्षण देत आहेत. सुधागड तालुक्यातील काही नागरिक नोकरी धंद्यासाठी पनवेल, ठाणे, पुणे, वसई व पालघर अशा शहरांमध्ये वास्तव्य करीत आहेत. शासनाने गावाकडेच रोजगार उपलब्ध करून दिला तर गावातील लोक स्थलांतर करणार नाहीत. परिणामी गावातील शाळा अबाधित राहतील.

मोफत शिक्षण, पुस्तके गणवेश व मध्यान भोजन यासारख्या सुविधा देऊनही जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थी संख्या वाढविण्यात शिक्षण विभागाला अपयश येत आहे. त्यामुळे आता असलेल्या शाळेची संख्या घटत आहे. शिवाय खासगी शाळांकडे पालकांचा वाढता ओढा हे शाळेतील पटसंख्या घटण्यामागेचे मूळ कारण आहे.




### आदिवासींचे स्थलांतर

***सुधागड तालुक्यामध्ये आदिवासीबहुल संख्या आहे, मात्र आदिवासी बांधव रोजगारासाठी मोठ्या प्रमाणात स्थलांतर करतात. अक्षरशः अनेक वाड्या पाडे ओस पडतात. परिणामी आपोआपच येथे जिल्हा परिषद शाळांतील विद्यार्थ्यांची संख्या कमी होताना दिसत आहे. अनेकदा मूळ आदिवासी वाड्यावर परतल्यावरदेखील मुलांना शाळेत घातले जात नाही.***

**जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत मोफत शिक्षण मोफत पुस्तके मोफत गणवेश मोफत धान्य भोजन यासारख्या सुविधा देऊनही पालक वर्ग विद्यार्थ्यांना प्राथमिक शाळेत न पाठवता खाजगी शाळेत पाठवत आहेत. त्यामुळे जिल्हा परिषद शाळांतील विद्यार्थ्यांची पटसंख्या कमी होताना दिसत आहे.**

**–सादुराम बांगारे,**
**गटशिक्षणाधिकारी, सुधागड**

# माथेरानमधील गणेश मंदिराचा जीर्णोद्धार

**माथेरान : प्रतिनिधी**

इंदिरा गांधी नगर भागातील रहिवाशांना त्यांचे अद्ययावत श्री गणेश मंदिर हवे होते. त्यासाठी वारंवार पाठपुरावा केला होता. राज्य सरकारच्या माध्यमातून या मंदिराचा जीर्णोद्धार होत असून याच गणेश मंदिराच्या रूपाने माथेरानच्या नैसर्गिक सौंदर्यात भर पडली आहे, असे आमदार महेंद्र थोरवे यांनी या मंदिराच्या जीर्णोद्धारावेळी आपले मत व्यक्त केले.

प्रारंभी गणेश मंदिराच्या नामफलकाचे अनावरण आणि फित कापून जीर्णोद्धार करण्यात आला. या वेळी माजी नगराध्यक्ष मनोज खेडकर, माजी विरोधी पक्षनेते शिवाजी शिंदे, प्रशासक राहुल इंगळे, एपीआय अनिल सोनाने यांनीही आपले अनमोल विचार या निमित्ताने प्रकट केले. व्यासपीठावर शिवसेना शहरप्रमुख चंद्रकांत चौधरी, उपशहर प्रमुख प्रमोद नायक, कर्जत शिवसेनेचे अमर मिसाळ, माथेरान शिवसेनेचे पदाधिकारी महिला वर्ग उपस्थित होते. या जीर्णोद्धारावेळी भंडाऱ्याचे आयोजन करण्यात आले होते.

इंदिरा गांधी नगर येथील सर्व कार्यकर्त्यांनी यासाठी विशेष परिश्रम घेतले.





**अलिबाग : भाजप महाराष्ट्र प्रदेश कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण यांचा भटके विमुक्त आघाडी राज्य सरचिटणीस राजू साळुंखे यांनी सन्मान केला. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर, भाजप प्रदेश उपाध्यक्ष अतुल काळसेकर, जिल्हा सरचिटणीस ॲड. महेश मोहिते, सागर पवार आदी उपस्थित होते.**



**नागोठणे : राष्ट्रवादीचे नेते दिलीप टके यांची सून पायल टके यांना वाढदिवसानिमित्त खासदार सुनील तटकरे यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी दिलीप टके, दिपाली टके, चेतन टके, प्रियांका टके, नैमिष टके व इशान चेतन टके आदी उपस्थित होते.**

# शीघ्रे येथे नैसर्गिक शेतीचे प्रशिक्षण

**मुरूड : प्रतिनिधी**

डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली अधिनस्त कृषि विज्ञान केंद्र, रोहा आणि मुरूड–जंजिरा शेतकरी उत्पादक कंपनी, मुरूड–जंजिरा यांचे संयुक्त विद्यमाने केंद्र शासनाच्या नैसर्गिक शेती प्रकल्पांतर्गत एक दिवसीय शेतकरी प्रशिक्षण शीघ्रे येथे नुकतेच आयोजित करण्यात आले होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषि विज्ञान केंद्राचे प्रमुख डॉ. मनोज तलाठी हे उपस्थित होते. त्याचप्रमाणे मार्गदर्शक तज्ञ म्हणून डॉ. राजेश मांजरेकर, जीवन आरेकर व डॉ. प्रमोद मांडवकर हे उपस्थित होते. प्रशिक्षणास प्रमुख अतिथी म्हणून कृषि विज्ञान केंद्र, रोहाच्या शास्त्रीय सल्लागार समितीचे सदस्य श्रीधर जंजिरकर हे उपस्थित होते.



कार्यक्रमाचे सुरूवातीला कृषि विज्ञान केंद्राचे विस्तार विषय तज्ञ डॉ. प्रमोद मांडवकर यांनी प्रशिक्षण कार्यक्रमाचे रूपरेषा नमूद केली. डॉ. मनोज तलाठी यांनी नैसर्गिक शेतीतज्ञ म्हणून मार्गदर्शन करताना गोपालन आधारीत शेती पध्दतीची माहिती दिली. बीजामृत, जीवामृताची निर्मिती व वापर याविषयी शेतक–यांना डॉ. मनोज तलाठी यांनी मार्गदर्शन केले. जीवन आरेकर यांनी पिकांवरील किड व रोग नियंत्रणाच्या उपाययोजना करताना दशपर्णी अर्क, ब्रम्हास्त्र व निमास्त्र निर्मिती व वापर याविषयी माहिती दिली.

शेतक–यांना मुरूड–जंजिरा शेतकरी उत्पादक कंपनीमध्ये सहभागी होता यावे याकरीता कंपनीचे अध्यक्ष श्रीधर जंजिरकर आणि कंपनीच्या सी.ई.ओ. ऋतुजा मॅडम यांनी शेतकऱ्यांना माहिती दिली. दुपारच्या सत्रानंतर प्रगतशील शेतकरी दत्ता गोविंद मांदाडकर यांचे सेंद्रिय शेतीच्या प्रक्षेत्रात भेट देण्यत आली. मांदाडकर यांच्या दुग्धव्यवसाय, शेळीपालन व भाजीपाला लागवड प्रक्षेत्रावरील विविध पिकांची माहिती शेतकऱ्यांना देण्यात आली व सेंद्रिय / नैसर्गिक निविष्ठा निर्मिती व वापर यांचे प्रत्यक्ष विवेचन डॉ. राजेश मांजरेकर यांनी केले.

कार्यक्रम यशस्वी होण्याकरीता शेतकरी उत्पादक कंपनीचे सदस्य मुशरीफ खतीब व शीघ्रे ग्रामस्थ यांनी विशेष प्रयत्न केले. या प्रशिक्षणाचा लाभ ५५ शेतकऱ्यांनी घेतला.

# आदिवासी भागात माझी वसुंधरा अंतर्गत उपक्रम

**चौक : प्रतिनिधी**

माझी वसुंधरा ५.० अंतर्गत ग्रुप ग्रामपंचायत चौक यांनी विविध पर्यावरण पूरक आणि सामाजिक उपक्रम राबविण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे आदिवाशी दुर्गम भागातील आदिवासी भागात विकास उपक्रम राबविण्यास सुरुवात झाली आहे.

डोंगर आणि दुर्गम भागातील आदिवासी जनतेसाठी काम करण्यास ग्रामपंचायतची सर्व यंत्रणा कामाला लागली आहे.पंच महाभुते आधारीत पर्यावरण संतुलन टिकविण्यासाठी काम करताना वेगळी ऊर्जा मिळते, असे ग्रामपंचायत सरपंच रितू ठोंबरे यांनी सांगून माझी वसुंधरा ५.० अंतर्गत राबवित असलेल्या उपक्रमाची माहिती ग्राम पंचायत अधिकारी एस.पी. जाधव यांनी दिली.

अनेक माझी वसुंधरा कार्यक्रमांतर्गत ग्रामपंचायत चौक यांनी आदिवासी बांधव यांचे वन हक्क दावे शिबिर आयोजित करून त्या संदर्भातील माहिती दिली व अर्ज भरून घेतले, तर आरोग्य शिबिराचा कार्यक्रम घेऊन विवीध प्रकारच्या शारीरिक तपासणी करून निदान केले, त्याप्रमाणे औषध उपचार देण्यात आली.

माझी वसुंधरा ५.० अंतर्गत ग्राम पंचायत हद्दीतील प्राथमिक शाळांमधून वाचन आणि वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली. या वेळी मुलांच्या कौशल्य गुणांची पारख करून त्यांना प्रोत्साहित करण्यात आले. प्लास्टिक पिशव्या बंदी, झाडे लावा, वृक्ष रोपण करून त्याची जोपासना करण्यासाठी कटिबद्ध राहण्याचा संकल्प सोडण्यात आला. माझी वसुंधरा अभियानात ज्येष्ठ नागरिक यांचा सहभाग मोठ्या प्रमाणावर दिसून आहे.



# बी.एल. पाटील तंत्रनिकेतनमध्ये मराठी भाषा संवर्धन पंधरवडा

**खोपोली : प्रतिनिधी**

नव्या तरुण पिढीत मातृभाषेबद्दलची गोडी निर्माण करण्यासाठी मराठी भाषा विभाग व तंत्रशिक्षण संचालनालय यांचे आदेशनुसार बी.एल. पाटील तंत्रनिकेतनमध्ये मराठी भाषा संवर्धन पंधरवडा आणि 'वाचन संकल्प सोहळा शुक्रवारी झाला.

बी.एल.पाटील तंत्रनिकेतन, कोकण मराठी साहित्य परिषद शाखा खोपोली आणि खोपोली नगर परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने खोपोलीतील लेखक, कवींना मानपत्र प्रदान करून सन्मानित करण्यात आले आहे.



मराठी भाषा संवर्धन पंधरवडा आणि 'वाचन संकल्प उपक्रमानिमित्ताने लेखक, कवींना मानपत्र प्रदान बी.एल. पाटील तंत्रनिकेतनच्या सभागृहात झाला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी केटीएसपी मंडळाचे अध्यक्ष संतोष जंगम होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून खोपोली नगरपालिकेचे प्रशासक, मुख्याधिकारी डॉ.पंकज पाटील होते. संस्थेचे उपाध्यक्ष अबूबकर जळगांवकर,संचालक जितेश ठक्कर, चंद्रकांत केदारी, भास्कर लांडगे, माजी अध्यक्ष उल्हासराव देशमुख, कोमसपाचे अध्यक्षा उज्वला दिघे, बी.एल. पाटील तंत्रनिकेतनचे प्राचार्य प्रशांत माने उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सरस्वती पूजन आणि साहित्यरत्न र.वा.दिघे यांना अभिवादन करण्यात आले.


**DR. BABASAHEB AMBEDKAR RESEARCH & TRAINING INSTITUTE (BARTI), PUNE**

(An Autonomous Institute of the Dept. of Social Justice and Special Assistance, Govt. of Maharashtra) Office: 28. Queens Garden, Camp. Pune-411001

TEL No. 020-26343600/263333330/26333339 Website: www.barti.in E-mail:dg@barti.in

BARTI/Computer Dept/ Networking/2024-25/ Date: 06/02/2025

**E-Tender Notice**

Request for Proposal (in Two Bid system - Technical Bid & Commercial Bid) are invited for Selection of Agency for Setting up Networking at Dr. Babasaheb Ambedkar Rashtriya Smarak, Mahad. Interested bidder having adequate resources and experience can submit their Technical Bid & Commercial Bid online on website https://mahatenders.gov.in

| Name of the Service | Tender Fee (in Rs) | Earnest Money Deposit (EMD) (in Rs) |
|---|---|---|
| Request for Proposal for Selection of Agency for Setting up Networking at Dr. Babasaheb Ambedkar Rashtriya Smarak, Mahad | Rs. 18,000/- | Rs. 2,00,000/- |

*1. The Bid document available on website https://mahatenders.gov.in*
*2. The detailed bid document is also available on BARTI website i.e. https://barti.maharashtra.gov.in*
*3. Interested bidders shall submit their bid on or before 24/02/2025, 12:00 hrs.*
*4. Right to reject any part of the bid or all the bids is reserved by Director General, BARTI, Pune.*

**Sd/-**
**(Sunil Ware, IRAS)**
**Director General, BARTI, Pune**



**रोहा अष्टमी नगर परिषद**

ता. रोहा, जि.रायगड पिन कोड नं. ४०२१०९

फोन नं. कार्यालय – ०२१९४/२३५७३७ फॅक्स नं. ०२१९४/२३४०७८

email : rohanagarpalika@ gmail.com

**क्र.रोनप/विद्युत/नि.सु./म.पु.प.वि.दु./१५८०/२०२४–२५** **दिनांक ०७/०२/२०२५**

**जाहीर निविदा सूचना**

रोहा नगर परिषद रोहा यांजकडून रोहा नगर परिषदेच्या विद्युत विभागास खालिल नमुद केलेल्या कामांसाठी अनुभवी व इच्छुक ठेकेदारांकडून निविदा दरपत्रक मागविणेत येत आहेत.

| अ.क्र | कामाचे नांव | इसारा रक्कम (रूपये) | कोरी निविदा फॉर्म फी | काम पुर्ण करणेची मुदत |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १. | रोहा नगर परिषदेच्या नदी संवर्धन गार्डनमधील छ. शिवाजी महाराज पुतळा परिसरातील विद्युत उपकरणे व महाप्रवेशद्वार यांची आवश्यक विद्युत दरूस्ती करणे | १०००० | १००० | कामाचे आदेश दिलेपासून ३० दिवस. |

**निविदा अटी / शर्ती :–**

१) विहीत नमुन्यातील सर्व अटी शर्तीसह निविदा पत्रे/फॉर्मची विक्री नगर परिषद कार्यालय, रोहा येथे कार्यालयीन वेळेत दिनांक १०–०२–२०२५ पासून १८–०२–२०२५ रोजीपर्यंत कार्यालयिन वेळेत दुपारी ४.०० वाजेपर्यंत कामकाजाचे दिवशी रक्कम रुपये वर नमुद केलेप्रमाणे नगर परिषद कार्यालयात रोखीने भरणा करुन निविदा पत्रे/फॉर्म प्राप्त करुन घेता येतील.
२) याकामी बयाणा/इसारा रक्कम रोखीने दिनांक १०–०२–२०२५ पासून १८–०२–२०२५ रोजी पर्यंत कार्यालयिन वेळेत दुपारी ३.०० वाजेपर्यंत कामकाजाचे दिवशी रक्कम रुपये वर नमुद केलेप्रमाणे नगर परिषद कार्यालयात रोखीने भरणा करावी.
३) विहीत निविदा पत्रके वेगवेगळ्या दोन सिलबंद लखोट्यात लखोटा क्र.१ व लखोटा क्र.२ सिलबंद करून दोन्ही लखोटे एका मोठ्या लखोट्यामध्ये सिलबंद करून अशा लखोट्यावर करावयाचे कामाचे नाव ठळक अक्षरात नमूद करून मुख्याधिकारी, रोहा नगर परिषद, रोहा, यांचे कार्यालयात दिनांक १०–०२–२०२५ पासून १८–०२–२०२५ दुपारी ४.०० वाजेपर्यंत किंवा तत्पूर्वी दाखल करता येतील.
४) जी.एस.टी. (वस्तु व सेवा कर) कराचा पडणाऱ्या भाराचा विचार करूनच निविदेतील दर सर्व करांसहित असावेत. बिलाची आकारणी केलेनंतर कर अतिरिक्त अनुज्ञेय राहणार नाहीत
५) लखोटा क्रमांक १ उघडून निविदा फॉर्ममध्ये नमुद केलेल्या आवश्यक त्या कागदपत्रांची छाननी केली जाईल व पात्र अथवा अपात्र निविदा बाबत अभिप्राय नोंदविल्यानंतर केवळ पात्र निविदांचा लखोटा क्रमांक २ शक्यतो दिनांक १८–०२– २०२५ रोजी सायंकाळी ५.०० वा किंवा प्रशासकिय सोईनुसार निविदाधारकांसमोर किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या प्रतिनिधींसमोर करणेत येईल
६) कोणतेही कारण नमुद न करुन अथवा असे कारण न देता आलेल्या एक अथवा सर्व निविदा स्विकारणे अथवा फेटाळणेचा अधिकार नगर परिषदेने राखून ठेवला आहे.
७) विषयांकीत कामाचे देयक ठेकेदारास नगर परिषदेकडे जसा निधी उपलब्ध आसेल त्या प्रमाणात अदा करणेत येईल.
८) निविदे संदर्भात काही माहिती हवी असल्यास कार्यालयिन वेळेत नगर परिषद कार्यालयातील विद्युत विभागात संपर्क करून अथवा प्रत्यक्ष कार्यालयात उपस्थित राहून माहिती घ्यावी.

**सही/–**
**(अजयकुमार एडके)**
**मुख्याधिकारी**
**रोहा अष्टमी नगर परिषद**

# मारहाण झालेला कलाकार प्रणित मोरेची भाजप नेते रवींद्र चव्हाण यांच्याकडून विचारपूस

## आमदार प्रशांत ठाकूर यांनीही केला भ्याड हल्ल्याचा निषेध



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सुप्रसिद्ध स्टँडअप कलाकार प्रणित मोरे याला नुकतीच सोलापूरमध्ये मारहाण झाली होती. हा कलाकार पनवेल मतदारसंघातील खारघरमधील असून त्यांच्यासोबत आमदार प्रशांत ठाकूर यांनी संवाद साधून घडलेल्या संपूर्ण घटनेची माहिती घेत त्याला सर्वतोपरी सहकार्य करणार असल्याची ग्वाही दिली तसेच या निंदनीय घटनेचा निषेध केला. दरम्यान, भाजपचे प्रदेश कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनीही प्रणित मोरे याची भेट घेऊन त्याची विचारपूस केली.

पनवेल मतदारसंघातील खारघरमधील रहिवासी आणि सुप्रसिद्ध स्टँडअप कलाकार प्रणित मोरे उर्फ महाराष्ट्रीयन भाऊ याने मुंबईमध्ये झालेल्या त्याच्या कार्यक्रमात सिनेअभिनेता वीर पहाडिया याला लक्ष्य करून विनोद केला होता तसेच तो व्हिडीओ सोशल मीडियावर पोस्ट केला होता.

दरम्यान, तो सोलापूर येथे एका कार्यक्रमासाठी आला असता वीर पहाडियावर केलेल्या विनोदाचा राग मनात धरून ते जणांनी त्याला मारहाण केली होती. या घटनेची माहिती मिळताच आमदार प्रशांत ठाकूर यांनी प्रणित मोरेसोबत फोन चर्चा केली तसेच त्याची प्रत्यक्ष भेटून विचारपूस करून हा प्रकार अतिशय निंदाजनक आहे. कलाकारांवर होणारे असे भ्याड हल्ले आपल्या संस्कृती संपन्न महाराष्ट्रामध्ये कधीच सहन केले जाणार नाहीत अशी भावना व्यक्त केली.

या सर्व प्रकारची माहिती भाजप महाराष्ट्र प्रदेश कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण ह्यांनाही देण्यात आली. त्यांनी देखील ह्या घटनेचा तपास अधिक गतीने व्हावा आणि आरोपींना कडक शिक्षा व्हावी ह्यासाठी सर्व प्रयत्न करू, असे आश्वासन प्रणित मोरे आणि त्यांचा कुटुंबीयांना दिले. या वेळी भाजप सांस्कृतिक सेल जिल्हा अध्यक्ष अभिषेक पटवर्धन, युवा मोर्चाचे उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष मयुरेश नेतकर, जिल्हा उपाध्यक्ष चिन्मय समेळ उपस्थित होते.

# अनधिकृत बांधकामावर धडक कारवाई



**नवी मुंबई : बातमीदार**

महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या वतीने नोटीस देऊनही संबधितांनी नोटिशीची दखल न घेतल्यामुळे अनधिकृत बांधकामाविरोधात नवी मुंबई महानगरपालिका विभागामार्फत मा. आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार व अतिरिक्त आयुक्त डॉ. राहुल गेठे यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण विभागाने ऐरोली विभागात निष्कासनाची कारवाई करण्यात आली.

नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील जी विभाग ऐरोली अंतर्गत ऐरोली येथील आरसीसी इमारतीचे बांधकाम नवी मुंबई महानगरपालिकेची कोणतीही परवानगी न घेता अनधिकृतपणे सुरु केले होते. सदर अनधिकृत बांधकामास ऐरोली विभागामार्फत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम ५४ अन्वये नोटीस बजाविण्यात आलेली होती. संबंधितांनी केलेले अनधिकृत बांधकाम स्वत:हून हटविणे आवश्यक होते, परंतु त्यांनी अनधिकृत बांधकाम सुरू ठेवले होते. सदरचे अनधिकृत बांधकाम अतिक्रमण मोहिम राबवून सदर बांधकाम अंशत: निष्कासित करण्यात आले आहे. तसेच दंडात्मक रक्कम एकूण ५० हजार रुपये वसूल करण्यात आले आहे.

या धडक मोहिमेसाठी २ गॅस कटर, ८ ब्रेकर, २५ मजूर व ०१ मुकादम यांचा वापर करण्यात आलेला असून मोहिमेकरीता जी विभाग ऐरोली, सहाय्यक आयुक्त डॉ. अंकुश जाधव, कनिष्ठ अभियंता संदिप म्हात्रे व इतर अधिकारी / कर्मचारी तसेच अतिक्रमण पोलिस पथक उपस्थित होते. तसेच यापुढे देखील अशा प्रकारे अतिक्रमण विरोधी कारवाई अधिक तीव्र करण्यात येणार आहे.

# म्युनिसिपल एम्प्लॉइज युनियनच्या मध्यवर्ती कार्यालयाचे उद्घाटन; दिनदर्शिकेचे प्रकाशन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गोखले सभागृह हॉलमध्ये युनियनच्या मध्यवर्ती कार्यालयाचे उद्घाटन व दिनदर्शिका प्रकाशन सोहळा मोठ्या दिमाखात झाला.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष ॲड. सुरेश ठाकूर व भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, माजी नगरसेवक नितीन पाटील, जेएनपीटी ट्रस्टी कॉम्रेड भूषण पाटील, ॲड. प्रकाश बेनेदार माजी नगरसेवक गणेश कडू, म्युन्सिपल मजदूर युनियनचे अध्यक्ष अशोक जाधव माझी प्रशासकीय अधिकारी सुधीर दांडेकर पनवेल महानगरपालिकेचे मुख्य अग्निशमन अधिकारी प्रवीण बोडके, श्रीराम पुरी यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये गोखले हॉल शेजारी युनियनच्या मध्यवर्ती कार्यालयाचे उद्घाटन पार पडले. त्यानंतर गोखले हॉल येथे झालेल्या जाहीर सभेत युनियनच्या दिनदर्शिकेचा प्रकाशन सोहळा झाला.

स्वागताध्यक्ष अनिल जाधव यांनी उपस्थितांचे स्वागत करताना अनेक प्रश्नांसह कामगार चळवळीचे महत्त्व पटवून दिले. कामगार नेते संतोष पवार यांनी प्रस्तावना करताना राज्यात पनवेल महापालिकेसह नगरपरिषदा व नगरपंचायतीमधील कामगारांना भेडसावणाऱ्या अनेक प्रश्नांवरती साकल्याने चर्चा करताना मा. न्यायालयाचे आदेश तसेच शासन निर्णय होऊनही जे अंमलबजावणी करत नाही अशा अधिकाऱ्यांवर





कायद्यातील तरतुदीनुसार शिस्तभंगाची कारवाई करण्यातची मागणी भविष्यात नाईलाजास्तव केली जाईल. त्याचप्रमाणे योग्य प्रश्न विविध प्रशासन तसेच शासन यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा करण्यासाठी हे पनवेल मध्यवर्ती कार्यालय कटिबद्ध राहणार आहे.

या वेळी मान्यवरांची समयोचीत भाषणे झाली व त्यांनी कामगारांना असे आश्वासन दिले की, जे प्रश्न कामगारांचे प्रलंबित आहेत ते सर्व प्रश्न त्वरित सोडवण्यात येतील विशेषतः पनवेल महानगरपालिका सर्व कामगारांना मेडिकल योजना तसेच सफाई कामगारांचे बंद झालेली साप्ताहिक सुट्टी सार्वजनिक सुट्टी पुन्हा सुरू करण्यात येईल, सफाई कामगारांना वारसाहक्क आणि कंत्राटी कामगारांना किमान वेतन तसेच ग्रामपंचायतमधून महापालिकेत समावेशन झालेल्या सर्व कामगारांना त्यांच्या मूळ नेमणुकीच्या तारखेपासून १ ऑक्टोबर २०१६ पासून सर्व बाबींवर सेवा विषयक लाभ यावर त्वरित निर्णय घेण्यात येतील, श्रमसाफल्य घरकुल योजनेसह आणि ईतर कामगारांच्या प्रश्नांवर सर्वजण कामगारांसोबत आहोत आणि युनियन बरोबर आम्ही युनियनने पुकारलेल्या संघर्षामध्ये आम्ही बरोबरीने लढणार असे आश्वासन दिले.

कार्यक्रमावेळी ॲड. सिद्धार्थ इंगळे, ॲड. योगिता म्हात्रे, ॲड. दीपक ठाकूर, ॲड. अनिरुद्ध जाधव, ॲड. राहूल गायकवाड, ॲड प्रमिला पवार, सुजित पाटील, सुधर्म घरत, जिल्हाध्यक्ष हिंगोली भिवाजी, रमेश कदम, गायकवाड, रायगड जिल्हाध्यक्ष राकेश पाटील, जिल्हाध्यक्ष भूषण काबाडी, जिल्हाध्यक्ष अजिंक्य हुळवणे, सचिन रसाळकर उपस्थित होते. सर्व व्यवस्था कोषाध्यक्ष दत्तगुरु म्हात्रे आणि त्यांची संपूर्ण टीम यांनी केली शैलेश गायकवाड यांनी आभार मानले.



**उलवे नोड :** दिल्ली विधानसभा निवडणूक २०२५मध्ये दिल्लीकरांनी भाजपला मोठी आघाडी मिळवून देत महाविजय साध्य केला आहे. याबद्दल सेक्टर १९मधील पक्ष कार्यालयासमोर आमदार महेश बालदी यांनी पदाधिकारी व कार्यकर्त्यांसोबत जल्लोष केला.



# नागाव ग्रामपंचायतीतर्फे हळदीकुंकू

**उरण : वार्ताहर**

उरण तालुक्यातील नागांव ग्रामपंचायत वतीने नागांव ग्रामपंचायत हद्दीतील महिलांसाठी हळदीकुंकू समारंभ ग्रामपंचायत येथे नुकताच आयोजित करण्यात आला होता. सुमारे ७०० महिला उपस्थित होत्या.

आलेल्या महिलांना हळदीकुंकू करून सर्वांना खाऊ वाटून भेट वस्तू देण्यात आल्या. हळदीकुंकू सोहळ्यात महिलांची एकजूट दिसून आली. या कार्यक्रमास नागांव ग्रामपंचायत सरपंच चेतन गायकवाड, उपसरपंच भूपेंद्र घरत, ग्रामसेवक अधिकारी किरण केणी, ग्रामपंचायत सदस्या दिपिका पाटील, विनया ठाकूर, दर्शना कुथे, सुरेखा थळी, अमृता घरत, प्रिया पाठारे, ग्रामपंचायत सदस्य मोहन काठे, जितेंद्र नाईक कर्मचारी वर्ग आदी उपस्थित होते.

संक्रांतींचे हळदीकुंकू हा सामजिक ऐक्याचा व विचारांच्या देवाण घेवाणीचा समारंभ बनत आहे. सर्व स्थितीत महिलांनी सहभागी होणे ही काळाची गरज असल्याचे ग्रामपंचायत सदस्या दीपिका पाटील यांनी सांगितले.

# मोहोपाडा राजिप शाळेला मिनी सायन्स लॅब



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी पाताळगंगा अतिरिक्त एमआयडीसी परिसरातील कोकुयो कॅमलीन कंपनीच्या वतीने सिएसआरमधून मोहोपाडा येथील जिल्हा परिषद शाळेत मिनी सायन्स लॅब सुरू करण्यात आली.

या लॅबचे उद्घाटन कोकुयो कॅमलीन कंपनीचे व्हाईस चेअरमन श्रीराम दांडेकर यांच्याहस्ते करण्यात आले. या सायन्स लॅब मुळे जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना विविध प्रयोगातून विज्ञानाचे महत्त्व कळणार आहे.

या वेळी विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंदाचे वातावरण दिसून आले, तसेच शालेय मुख्याध्यापिका व शिक्षकांनी कोकुयो कॅमलीन कंपनीचे व्हाईस चेअरमन श्रीराम दांडेकर, कंपनी हेड दिपक कापसे, एच आर डिजिएम अमोल फुलोडकर यांचे आभार मानले. या वेळी शालेय शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# लक्ष्मीकांत गलांडे यांना पुरस्कार

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

मोहोपाडा येथील महावितरणाचे सहाय्यक अभियंता लक्ष्मीकांत लालासाहेब गलांडे यांना नुकताच नवी मुंबई येथे झालेल्या कार्यक्रमात शासकीय नोकरीसमवेत सामाजिक क्षेत्रामध्ये योगदान दिल्याबद्दल भारतीय सेनेतील शौर्य पुरस्कार प्राप्त मधुसूदन सुर्वे व न्यूज १८च्या वृत्त निवेदिका गार्गी गोरेगावकर यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज समाजभूषण पुरस्कार देवून मान्यवरांच्या उपस्थितीत सन्मान करण्यात आला.त्यांना छत्रपती शिवाजी महाराज समाजभूषण पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# ३ मार्चला नवी मुंबई महापालिका लोकशाही दिन

**नवी मुंबई : बातमीदार**

महाराष्ट्र शासन निर्देशानुसार नवी मुंबई महापालिका स्तरावर प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयात लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. माहे मार्च महिन्याचा लोकशाही दिन ३ मार्च २०२५ रोजी होणार असून अर्जदारांनी विहित नमुन्यात आपला अर्ज दोन प्रतींमध्ये १७ फेब्रुवारी २०२५ पर्यंत मा.आयुक्त, नवी मुंबई महापालिका यांचे नावे 'लोकशाही दिनाकरीता अर्ज' असे दर्शनी भागी ठळकपणे नमूद करुन सादर करावयाचा आहे.

या अर्जात नमूद तक्रार / निवेदन हे वैयक्तिक स्वरुपाचे असावे. अर्ज एकाच विभागाशी संबंधित एकाच विषयाबाबत असावा. अर्जदाराने संबंधित विषयाबाबत या आधी विभाग कार्यालय, विभागप्रमुख स्तरावर निवेदन सादर केलेले असावे. याशिवाय लोकशाही दिनामध्ये न्यायप्रविष्ट प्रकरणे, राजस्व/ अपिल, सेवाविषयक–आस्थापना विषयकबाबी याबाबतचे अर्ज स्विकारले जाणार नाहीत याची नोंद घेण्यात यावी.

विहित नमुन्यात नसणारे व अर्जासोबत आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रती न जोडलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत. तसेच तक्रार



/ निवेदन वैयक्तिक स्वरुपाचे नसेल तर तसेच यापूर्वीच अंतिम उत्तर दिलेले आहे/ देण्यात येणार आहे अशा प्रकरणी पुन्हा त्याच विषयासंदर्भात केलेले अर्जही स्विकारले जाणार नाहीत याचीही नागरिकांनी नोंद घ्यावी, असे सूचित करण्यात येत आहे.

लोकशाही दिनाकरीता करावयाच्या अर्जाचा विहित नमुना नागरिकांसाठी महानगरपालिका नूतन मुख्यालय इमारत, जनसंपर्क विभाग, तिसरा मजला, से. १५ ए, किल्लेगांवठाण जवळ, सी.बी.डी., बेलापूर येथे विनामूल्य उपलब्ध असून नवी मुंबई महानगरपालिकेचे संकेतस्थळावर अर्ज नमुना प्रत सहजपणे डाऊनलोड करून घेता येऊ शकते याची नागरिकांनी नोंद घ्यावी, असे आवाहन करण्यात येत आहे.

## क्लिक...क्लिक...!





पनवेल : भाजपने दिल्ली विधानसभा निवडणुकीत विजय मिळविल्यानंतर कार्यकर्त्यांनी पेढे वाटून, फटाके वाजून आनंदोत्सव साजरा केला.

# माणगावमधील अतिक्रमणे जमीनदोस्त



**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव शहरात मुंबई-गोवा महामार्गालगत छोट्या मोठ्या व्यापाऱ्यांनी टपऱ्या व दुकाने थाटली होती. येथील नगरपंचायतीचे मुख्याधिकारी संतोष माळी यांनी अतिक्रमण हटाव मोहीम हाती घेतली असून या अंतर्गत अनधिकृत बांधकामे जमीनदोस्त करण्यात आली आहेत.

माणगाव शहर हे भौगोलिकदृष्टचा रायगड जिल्ह्याचे मध्यवर्ती ठिकाण आहे. हेच शहर सध्या वाहतूक कोंडीचे माहेरघर म्हणून ओळखले जाऊ लागले आहे. शनिवार, रविवार आणि सोमवार या दिवशी तर माणगाव शहरातून चालणे हे पादचारी नागरिक आणि वाहनचाकांना डोकेदुखी होऊन जाते. यास माणगाव येथे मुंबई-गोवा हायवेलगत असणारी व्यापारी लोकांनी केलेली अतिक्रमणे मूलभूत कारणीभूत असल्याचे अधोरेखित करत माणगाव नगरपंचायतने या अतिक्रमनांना नोटिसा बजावल्या होत्या. त्यानंतर हातोडा कारवाईचे सत्र सुरू केले आहे.

माणगाव शहरात अनधिकृत व बेकायदेशीर बांधकामे करून महामार्ग व रस्ता काबीज केला गेला होता. त्यामुळे सातत्याने वाहतूक कोंडी माणगाव शहरात होत होती. नागरिकांना महामार्गावरून चालताना जीव मुठीत घेऊन चालावे लागत होते. याची दखल घेऊन नगरपंचायत मुख्याधिकारी संतोष माळी यांच्या मार्गदर्शनाखाली माणगाव शहरातील सर्वच शासकीय जागेवरील अतिक्रमण जमीनदोस्त करण्यात येत आहेत. पोलीस बंदोबस्तात शासकीय जागेवरील अतिक्रमण जेसीबीच्या सहाय्याने हटविण्यात आले.

मुंबई-गोवा महामार्गावर जेसीबीच्या सहाय्याने अतिक्रमणाची कारवाई सुरू असताना महामार्गावर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी झाली होती. माणगाव पोलीस व वाहतूक पोलीस यांच्या सहाय्याने वाहतूक कोंडी सोडविण्यात आली. अतिक्रमण कारवाई सुरू असताना महामार्गावर बघ्यांची तोबा गर्दी झाली होती, तर अतिक्रमणांवर कारवाई करत असताना तेथील दुकानदार यांनी यावेळी संताप व्यक्त केला. काही दुकानदारांनी आमच्याकडे स्टे ऑर्डर असल्याचे या वेळी सांगितले, परंतु मुध्याधिकारी संतोष माळी यांनी शांतपणे सर्वांना आवाहन केले. तुमच्याकडे कायदेशीर कागदपत्रे असल्यास ते दाखवा; अन्यथा शासकीय जागेवरील अतिक्रमण हटविण्यात येईल, असे स्पष्ट केले.

अतिक्रमण तोडल्याने माणगावकरांना वाहतूक कोंडीतून सुटका मिळेल अशी आशा असल्याने त्यांनी सुटकेचा श्वास घेतला आहे. भविष्याचा विचार करता रायगड जिल्ह्याचे विभाजन झाल्यास नवीन जिल्ह्याचे मध्यवर्ती ठिकाण हे माणगाव होऊ शकते. त्यामुळे माणगावच्या सर्वांगीण विकास होणे गरजेचे असल्याने शहरातील अनधिकृत बांधकामे जमीनदोस्त होणे आवश्यक आहे, असे नागरिकांमधून बोलले जात आहे.

**माणगाव शहरात मुंबई-गोवा महामार्गावर वाहतूक कोंडी हा जटिल प्रश्न बनला होता. माणगाव शहरातील शासकीय जागेवरील अतिक्रमण हटविण्यात येत असून कालवा रोड, बामणोली रोड कॉर्नर, मुंबई-गोवा महामार्गावरील फॉरेस्ट कॉर्नर, जुने एसटी स्टँड येथे असलेले अतिक्रमण हटविण्यात येत आहेत तसेच शहरातील सर्वच शासकीय जागेवरील अतिक्रमण हटविण्यात येणार आहेत.**

**-संतोष माळी, मुख्याधिकारी, माणगाव नगरपंचायत**

# खराब हवामानाचा श्रीवर्धनमध्ये मच्छिमारांना बसतोय फटका!

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

दक्षिण महाराष्ट्रातील कोकण किनारपट्टीवरील मच्छीमार सध्या अतिशय कठीण परिस्थितीत अडकले आहेत. गेल्या दोन महिन्यांपासून दक्षिणेकडील खराब हवामानामुळे मच्छिमारांचा व्यवसाय मोठ्या प्रमाणात प्रभावित झाला होता. आता उत्तरेकडील खराब हवामानामुळे परिस्थिती बिकट झाली आहे. समुद्रातील वादळे, अवकाळी पाऊस आणि वाऱ्यांच्या तीव्रतेमुळे मच्छिमारांच्या मासेमारीवर गंभीर परिणाम झाला आहे. या अडचणींमुळे मच्छिमारांच्या कुटुंबांना अन्न आणि आर्थिक संसाधनांसाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला आहे.

समुद्रात होणाऱ्या नुकसानामुळे बोटींचे नुकसान, जाळे फाटणे आणि अन्य सामानाची हानी झाली आहे. यामुळे मच्छिमारांचे कामकाज ठप्प झाले असून मोठ्या प्रमाणावर खर्च वाढला आहे. समुद्राच्या बदलत्या स्थितीमुळे त्यांच्या दैनंदिन जीवनावर प्रभाव पडला, ज्यामुळे त्यांना रोजगार मिळवणे जवळपास अशक्य होऊन गेले आहे.

या समस्येवर त्वरित उपाययोजना करणे अत्यंत गरजेचे आहे. मच्छिमारांना बोटी चालवण्यासाठी आवश्यक असलेल्या डिझेल, बर्फ, ऑईल, आणि खलाशीवर्गाच्या पगाराची अडचण मोठी आहे. याची शासनाने दखल घेऊन आर्थिक मदतीचे एक विशेष पॅकेज जाहीर करणे आवश्यक आहे.

श्रीवर्धन, मुळगाव, बागमांडला, शेखाडी, दिवेआगर, आदगाव, दिघी, कुडगाव आणि अन्य किनारपट्टी भागात मच्छिमारांनी बोटी नांगरल्या आहेत. त्यामुळे या भागांमध्ये शुकशुकाट पसरलेला आहे. मच्छिमारांना समुद्रात मासे मिळवणे जवळपास अशक्य झाले आहे, ज्यामुळे त्यांच्या व्यवसायाचा संपूर्ण पाया कोलमडला आहे.

या परिस्थितीला तोंड देत मच्छिमारांसाठी आता जीवन खूपच कठीण होऊन गेले आहे. त्यांच्या कुटुंबांना उपासमारीला सामोरे जावे लागणार आहे आणि त्यांचे अस्तित्व संकटग्रस्त होईल. मच्छिमारांचा व्यवसाय केवळ त्यांच्यासाठीच नव्हे, तर कोकणाच्या अर्थव्यवस्थेसाठीही महत्त्वपूर्ण आहे. शासनाने तातडीने त्यासाठी योग्य उपाययोजना करणे आवश्यक आहे.

**गेल्या दोन-तीन महिन्यांपासून मासेमारी ठप्प झाली आहे. बोटी किनाऱ्यावर नांगरून ठेवण्यात आल्या आहेत, ज्यामुळे मच्छिमारांची उपासमार सुरू आहे. मासेमारीवर अवलंबून असलेले छोटे-मोठे व्यावसायिक व रोजगार धोक्यात आले आहेत. आता उत्तरेकडील खराब हवामानामुळे मच्छिमारांचे कंबरडेच मोडले आहे. आर्थिक संकटात सापडलेले मच्छीमार पुन्हा एकदा कठीण परिस्थितीला तोंड देत आहेत. शासनाने तातडीने एक विशेष पॅकेज जाहीर करणे आवश्यक आहे.**

**-इम्यिाज कोकाटे, चेअरमन, कोकण मच्छीमार संस्था**

**गेल्या तीन महिन्यांपासून मच्छीमार दक्षिणेकडील खराब हवामानामुळे समुद्रात जाऊ शकले नाहीत आणि बोटी बंदरात नांगरून ठेवल्या होत्या. आता उत्तरेकडील खराब हवामानामुळे त्यांचे व्यवसाय पुन्हा ठप्प झाले आहेत. सण जवळ आले असून व्यापारी आणि बँकेचे कर्ज वाढतच आहेत. मच्छिमारांना संसार चालवण्यास अडचणी येत आहेत. आर्थिक संकटात सापडलेले मच्छीमार आता शासनाच्या मदतीची प्रतीक्षा करत आहेत.**

**-रामप्रसाद वाघे, चेअरमन, श्रीकृष्ण मच्छीमार संस्था**



# भूगोल प्रज्ञाशोध परीक्षेत नांदगाव हायस्कूलचे यश



**मुरूड : प्रतिनिधी**

शालेय विद्यार्थ्यांना भूगोल या विषयात अधिक रस वाढावा व या विषयाची आवड निर्माण होण्यासाठी तसेच स्पर्धा परीक्षेसाठी पूर्व तयारी म्हणून भूगोल प्रज्ञाशोध परीक्षा महाराष्ट्रातील भूगोल विषय मंडळाकडून घेतली जाते. नांदगाव हायस्कूलमधून २८८ शालेय विद्यार्थी या परीक्षेस बसले होते. त्यापैकी ७० उत्तीर्ण झाले.

या शाळेतील इयत्ता नववीमधील विद्यार्थिनी निधी नितीन पवार हिला १००पैकी ८४ गुण प्राप्त झाले. तिला सुवर्णपदक बहाल करण्यात आले. श्रावणी मिलिंद कुमरोटकर हिला १००पैकी ८० गुण प्राप्त झाले. तिला रौप्यपदक देण्यात आले. सातवीतील निखिल संदेश पाटीलला १००पैकी ७४ गुण प्राप्त झाले. त्यास कांस्यपदक देण्यात आले.

या परीक्षेत ४० शालेय विद्यार्थ्यांना ६०पेक्षा जास्त गुण मिळाले आहेत. भूगोल विषय समन्वयक म्हणून सागर राऊत, योगेश पाटील व महेश वाडकर यांनी कामकाज पहिले तसेच या परीक्षसेसाठी मुलांना प्रोत्साहित केल्याबद्दल मुख्याध्यापिका अर्चना खोत व पर्यवेक्षक प्रतीक पेडणेकर यांनासुद्धा भूगोल महामंडळाकडून सन्मानचिन्ह देण्यात आले.

यशस्वी विद्यार्थ्यांचा श्री छत्रपती शिवाजी नूतन विद्यालय यशवंतनगर नांदगाव येथील पटांगणावर मुख्याध्यापिका खोत यांच्या अध्यक्षतेखाली सत्कार झाला. या वेळी पर्यवेक्षक पेडणेकर, रवींद्र ढोले, भरत चव्हाण, शिल्पा कळके, दत्तात्रेय खुळपे, शिक्षकेत्तर प्रतिनिधी संतोष बुल्लू, भारती बांद्रे, रिंकल तिडके आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सागर राऊत यांनी केले, तर उपस्थितांचे आभार योगेश पाटील यांनी मानले.

## माणगाव येथे नेत्रतपासणी शिबिर

**माणगाव : प्रतिनिधी**

शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेल व विजयशेठ मेथा चॅरिटेबल ट्रस्ट माणगावतर्फे १२ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ९ ते दुपारी २ या वेळेत माणगाव जुने एसटी स्टँड सभागृह येथे मोफत नेत्रतपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

नेत्ररुग्णांनी नावनोंदणीकरिता विधिता मनीष मेथा (८६९८७४०६४०), सुप्रिया संतोष शिंदे (९०४९६६५५९८) यांच्याशी संपर्क साधावा.

# क्षत्रिय मराठा सोसायटीच्या पोलादपूर शाखेचे आज उद्घाटन

**महाड : प्रतिनिधी**

मध्य कोकण क्षत्रिय मराठा को-ऑप. क्रेडिट सोसायटी लिमिटेडच्या पोलादपूर येथील नवीन शाखेचा उद्घाटन सोहळा रविवारी (दि. ९) सकाळी ११ वाजता राज्याचे रोजगार हमी योजनामंत्री भरत गोगावले यांच्या हस्ते होणार आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भाजपचे विधान परिषदेतील गटनेते व मुंबई जिल्हा बँकेचे अध्यक्ष आमदार प्रवीण दरेकर भूषविणार आहेत.

कोकणातील मराठा तरुणांच्या व महिलांच्या आर्थिक उत्कर्षासाठी आमदार प्रवीण दरेकर यांच्या संकल्पनेतून या पतसंस्थेची पोलादपूर येथे स्थापना होत आहे.

उद्घाटन सोहळ्याला आमदार निरंजन डावखरे, आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे, मुंबई हौसिंग फेडरेशनचे अध्यक्ष प्रकाश दरेकर, अण्णासाहेब सावंत अर्बन बँकेच्या अध्यक्ष शोभा सावंत, हिरवळ प्रतिष्ठानचे अध्यक्ष किशोर धारिया, शिवसेना नेते हनुमंत जगताप, महाडच्या माजी नगराध्यक्ष स्नेहल जगताप, भाजप जिल्हा सरचिटणीस बिपीन म्हामुणकर, पोलादपूर नगराध्यक्ष सोनाली गायकवाड, रायगड जिल्हा बँकेचे संचालक एकनाथ गायकवाड, सभापती अंकिता निकम, शिवाई शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष विनोद देशमुख, माजी जि.प. सदस्य चंद्रकांत कळंबे, कीर्तनकार हभप रामचंद्र शिंदे, सामाजिक कार्यकर्ते सुभाष पवार, भाजप मागाठाणे महामंत्री कृष्णकांत दरेकर, मुंबई बँकेचे मुख्य सरव्यवस्थापक संदीप सुर्वे यांची प्रमुख उपस्थिती असेल, अशी माहिती क्षत्रिय मराठा को-ऑप. क्रेडिट सोसायटीचे अध्यक्ष राजेश येरुणकर, उपाध्यक्ष अंकुश मोरे, प्रसन्ना पालांडे, राजेश सकपाळ यांनी दिली.

## सिराज शेख यांचा सत्कार

**मुरूड : प्रतिनिधी**

स्व. मोहम्मद शफी पुरकर स्मृती पत्रकारिता पुरस्कार पत्रकार सिराज शेख यांना मिळाल्याबद्दल त्यांचा मुरूड तालुक्यातील बोर्ली मांडला येथील अंजुमन इस्लाम जंजिरा हायस्कूलच्या वतीने शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

या वेळी हायस्कूलचे चेअरमन हाजी यासीन दळवी, जामा मस्जिदचे इमाम मौलाना मुदस्सिर मुकादम, मुख्याध्यापक हनीफ पठाण, शाळेचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# माणगाव विवा कॉलेजचा विश्वा महोत्सव

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव येथील शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, क्रीडा क्षेत्रातील अग्रगण्य कॉलेज म्हणून ओळख असलेल्या प्रोफेशनल एजुकेशन सोसायटीचे विवा कॉलेजचा विश्वा २०२५ महोत्सव विविध कार्यक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला.

विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या कलागुणांना तसेच सुप्तगुणांना वाव मिळण्यासाठी वार्षिक क्रीडा महोत्सव आणि वार्षिक स्नेहसंमेलनाच्या निमित्ताने विश्वा २०२५ कार्यक्रमाचे कॉलेजतर्फे सलग आठ दिवस दिमाखदार पद्धतीने आयोजन करण्यात आले होते. या वार्षिक कार्यक्रमाचे औचित्य साधून कॉलेजतर्फे शैक्षणिक, सामाजिक, राजकीय, उद्योजकता आणि निवेदक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना पुरस्कार देऊन मान्यवरांच्या उपस्थितीत सन्मानित करण्यात आले.

विश्वा २०२५ महोत्सवात प्रामुख्याने लेखन, वाचन, मिस मॅच डे, रांगोळी स्पर्धा, बेडमेकिंग, मेहंदी, ट्रॅडिशनल कॉम्पिटिशन, परफेक्ट मॅच, क्रिकेट, कबड्डी, लगोरी तसेच स्नेहसंमेलन कार्यक्रम राज्याचे माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे यांचे स्वीय्य सहाय्यक राजेंद्र साळवी, माणगाव पोलीस ठाण्याचे निरीक्षक निवृत्ती बोऱ्हाडे, संपादक दिलदार पुरकर, भाजप युवा मोर्चा दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष निलेश थोरे, प्रसिद्ध उद्योजक विजय मेथा, माजी नगरसेवक सिराज परदेशी, आदर्श शिक्षिका विनया जाधव, संस्थेच्या चेअरमन विनया ढेपे, प्राचार्य डॉ. विवेक ढेपे, उपप्राचार्य योगेश रानभरे, शिक्षकवर्ग यांच्या उपस्थितीत झाले.



# महाड पत्रकार संघातर्फे सन्मान सोहळा

## पत्रकाराने ज्ञान आणि कौशल्य संपादन करावे -हेमंत देसाई



**महाड : प्रतिनिधी**

पत्रकारांबद्दल आदरभाव कमी होत चालला आहे. समाजानेसुद्धा चांगल्या पत्रकारांना जगवले पाहिजे. पत्रकाराने ज्ञान आणि कौशल्य वाढवण्यासाठी प्रयत्न करावेत. सध्या विज्वल माध्यम आता प्रभावी होत चालले आहे. लोक सखोल वाचत नाही, वरवरचे वाचतात. ज्यांनी वाचायला पाहिजे ते लिहीत सुटतात. जे विद्वान आहेत ते वाचत सुटतात आणि विद्वान आणि हुशार लोक व्यक्त होत नाहीत. त्यामुळे पत्रकाराने ज्ञान आणि कौशल्य वाढवण्यासाठी प्रयत्न करावेत, असे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार तथा राजकीय विश्लेषक हेमंत देसाई यांनी केले.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था आणि महाड पत्रकार संघ यांच्यामार्फत पत्रकार सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता. त्या वेळी प्रमुख अतिथी म्हणून देसाई बोलत होते. व्यासपीठावर वन क्षेत्रपाल राकेश साहू, रोटरी क्लब ऑफ रायगड फोर्ट अध्यक्ष मनीषा नगरकर, राष्ट्रीय स्मारक व्यवस्थापक प्रकाश जमधाडे, महाड पत्रकार संघाचे अध्यक्ष निलेश पवार आदी उपस्थित होते.

या वेळी ज्येष्ठ पत्रकार तथा राजकीय विश्लेषक हेमंत देसाई यांच्यासह इतर मान्यवरांच्या हस्ते यावर्षीचा स्व. रवींद्र पाटील निर्भीड पत्रकारिता पुरस्कार अलिबाग येथील ज्येष्ठ पत्रकार राजन वेलकर यांना, स्व. डॉ. मोहम्मद शफी पूरकर स्मृती पत्रकारिता पुरस्कार मुरूड येथील पत्रकार शेख सिराज हाशम यांना, स्व. दीपक साळुंखे स्मृती पत्रकारिता पुरस्कार तळा येथील पत्रकार विराज टिळक यांना, स्व. दीपक शिंदे स्मृती पत्रकारिता पुरस्कार माणगाव येथील पत्रकार अरुण पोवार यांना प्रदान करण्यात आला. त्याचप्रमाणे महाड पत्रकार संघातील सदस्य गोपाळ कांबळे व रघुनाथ भागवत यांना विशेष सन्मानित करण्यात आले.

हेमंत देसाई यांनी आपल्या भाषणाची सुरुवात करताना महाडच्या ऐतिहासिक भूमीतील काळकर्ते शि.म. परांजपे, दत्तो वामन पोतदार, नाना पुरोहित, मोहन धारिया, यशवंत टिपणीस यांच्या नावांचा उल्लेख करून या भूमीला लाभलेले हे खरे हिरे होते, असे सांगितले. मनीषा नगरकर, राकेश साहू यांनी आयोजित पत्रकार सन्मान सोहळ्याबद्दल कौतुक व्यक्त करून पुरस्कार प्राप्त पत्रकारांचे अभिनंदन केले. पत्रकार राजन वेलकर यांनीही मनोगत व्यक्त करताना महाड पत्रकार संघाचे विशेष आभार मानले.

महाड पत्रकार संघाचे अध्यक्ष पवार, उपाध्यक्ष महेश शिंदे, सचिव रोहित पाटील, खजिनदार राजेंद्र जैतपाळ, उदय सावंत, श्रीकांत सहस्रबुद्धे, भागवत, निलेश लोखंडे, चंद्रकांत कोकणे, कांबळे, नितेश लोखंडे, नितेश लोखंडे, योगेश भामरे, सुधीर सोनार, किशोर किर्वे, तुकाराम साळुंखे आदी सर्व सभासदांनी विशेष मेहनत घेऊन पत्रकार सन्मान सोहळा उत्साहात पार पडला. या सोहळ्याचे सूत्रसंचालन अविनाश घोलप व शिंदे यांनी, तर उपस्थितांचे आभार जैतपाळ यांनी मानले.

# 'मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेसाठी उमेदवारांनी ऑनलाईन नोंदणी करावी'

**रायगड : रामप्रहर वृत्त**

उमेदवारांचे कौशल्य विकसित होणे आवश्यक आहे. उद्योजक घडल्यास ते काही लोकांना रोजगार देऊ शकतात. त्यामुळे बेरोजगारी कमी होण्यासाठी मदत होते. उद्योजकांना चांगले कर्मचारी मिळावेत तसेच इच्छुक बेरोजगारांना काम मिळावे यासाठी शासनाच्या वतीने मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना योजना सुरू करण्यात आली आहे. उमेदवाराने कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या https://www.cmykpy.mahaswayam.gov.in/ संकेतस्थळावर नोंदणी केलेली असावी, असे जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र सहायक आयुक्त अ.मु. पवार यांनी सांगितले आहे.

उमेदवारांना उद्योजकाकडे प्रत्यक्ष कार्य प्रशिक्षणाद्वारे रोजगारक्षम योजना आपल्यासाठी करणे, हा या योजनेचा उद्देश आहे. उद्योजकांना त्यांच्या उद्योगासाठी आवश्यक असणारे मनुष्यबळ कार्य प्रशिक्षण (इंटर्नशिप)द्वारे उपलब्ध करून देण्याचे नियोजन करण्यात येते. तो कुशल, अनुभवी झाल्यानंतर त्याला चांगल्या संधी उपलब्ध होतात. रायगड जिल्यातील खाजगी आस्थापनांनी त्यांच्या मनुष्यबळाच्या उत्पादन क्षेत्रासाठी १० टक्के व सेवाक्षेत्रासाठी २० टक्के रिक्तपदे अधिसूचित करावीत.

https://www.cmykpy.mahaswayam.gov.in/ या संकेतस्थळावर Intern Loginमध्ये बारावी, आयटीआय, पदविका, पदवी व पदव्युत्तर शैक्षणिक पात्रता धारण केलेले रोजगार इच्छुक उमेदवार ऑनलाईन नोंदणी करू शकतील. विविध क्षेत्रातील मोठे प्रकल्प, उद्योग/स्टार्टअप्स, विविध आस्थापना आदींना आवश्यक असलेल्या मनुष्यबळाची मागणी ऑनलाईन नोंदविली जाते. सुमारे १० लाख कार्य प्रशिक्षण (इंटर्नशिप)च्या संधी प्रत्येक आर्थिक वर्षात या योजनेच्या माध्यमातून उपलब्ध होतात.

शैक्षणिक अर्हतेप्रमाणे विद्यावेतन (प्रतिमहिना), बारावी पास सहा हजार, आयटीआय/पदविका-आठ हजार, पदवीधर/ पदव्युत्तर-१० हजार, या कार्य प्रशिक्षण (इंटर्नशिप)चा कालावधी सहा महिने असेल व या कालावधीसाठी उमेदवारांना शासनामार्फत विद्यावेतन देण्यात येईल. विद्यावेतन लाभार्थ्यांच्या थेट बँक खात्यात जमा होईल.

उमेदवाराचे किमान वय १८ व कमाल ३५ वर्षे असावे. किमान शैक्षणिक पात्रता बारावी पास/ आयटीआय, पदविका, पदवीधर, पदव्युत्तर असावी. तो महाराष्ट्राचा अधिवासी असावा. आधार नोंदणी असावी. उमेदवाराचे बँक खाते आधार संलग्न असावे. अधिक माहितीसाठी कार्यालयाच्या ०२१४१-२२२०२९ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## नमो चषक अंतर्गत व्हॉलीबॉल स्पर्धा

# डिस्टन्स इलेव्हन संघ विजेता





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता युवा मोर्चा पनवेलच्या वतीने भव्य क्रीडा महोत्सव अर्थात नमो चषक २०२५ आयोजित करण्यात आला असून त्या अंतर्गत कामोठे येथे झालेल्या व्हॉलीबॉल स्पर्धेचे विजेतेपद डिस्टन्स इलेव्हन या संघाने पटकावले.

उदयोन्मुख खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी भारतीय जनता युवा मोर्चा पनवेलतर्फे येथील विधानसभा मतदारसंघात माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली भव्य क्रीडा महोत्सव अर्थात नमो चषक २०२५चे आयोजन करण्यात आले आहे. त्या अंतर्गत शनिवारी कामोठ्यातील लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलच्या मैदानावर पुरुष खुला गटाची व्हॉलीबॉल स्पर्धा पार पडली.

या स्पर्धेला आमदार प्रशांत ठाकूर व नमो चषकचे मुख्य आयोजक परेश ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. स्पर्धेचे उद्घाटन कामोठे भाजपचे अध्यक्ष रवींद्र जोशी यांच्या हस्ते झाले. या वेळी कामोठे पोस्ट ऑफिस अधिकारी बबन भोईर, माजी नगरसेवक एकनाथ गायकवाड, विकास घरत, विजय चिपळेकर, माजी नगरसेविका हेमलता गोवारी, ओबीसी सेलचे जिल्हाध्यक्ष राजेश गायकर, मागासवर्गीय सेलचे जिल्हाध्यक्ष अमित जाधव, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष व स्पर्धा समन्वयक मयुरेश नेतकर, जिल्हा सरचिटणीस अभिषेक भोपी, अक्षय सिंग, जय पावणेकर, भीमराव पोवार, भटके विमुक्त आघाडीच्या महिला अध्यक्षा विद्या तामखडे, साधना आचार्य, अनुसूचित मोर्चाचे कामोठे अध्यक्ष मयुर मोहिते, अनुसूचित महिला मोर्चा अध्यक्ष सोनाली खरटमोल, युवा मोर्चा कामोठे अध्यक्ष तेजस जाधव, कळंबोली अध्यक्ष गौरव नाईक, देवांशू प्रभाळे, आयुष किंद्रे, यश भोईर, कामोठे युवा मोर्चाचे सरचिटणीस प्रवीण कोरडे, उपाध्यक्ष सागर ठाकरे, चिटणीस किरण जाधव, विकी टेकवडे, कोषाध्यक्ष अमोल बिनवडे, अमित गोडसे, सुयोग वाफारे, प्रथमेश सातपुते, निलेश सरगर, आकाश शिंदे, शंकर कारंडे, सुयश कांबळे, मयुर शिंदे, प्रणिल पवार, आकाश सिंग, आयुष कातोरे, नयन चौगुले, पार्थ लाले, रितेश कानोजिया, ओम पाटील, करन जगदाळे, प्रज्वल यांच्यासह इतर कार्यकर्ते व क्रीडारसिक उपस्थित होते.

उपविजेतेपद केवायसी इलेव्हन, तृतीय क्रमांक आयांश इलेव्हन, तर चतुर्थ क्रमांक संघ इलेव्हन संघाने प्राप्त केले. विजेत्या संघाला १५ हजार रुपये व चषक, द्वितीय १० हजार रुपये व चषक, तृतीय पाच हजार रुपये व चषक, तर चतुर्थ क्रमांकाच्या संघाला तीन हजार रुपये व चषक देऊन गौरविण्यात आले.

## टीआयपीएल सिझन १ लेदर बॉल क्रिकेट चॅम्पियनशिपचे उद्घाटन






**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सोसायटी क्रिकेट क्लबच्या वतीने १४ वर्षाखालील टीआयपीएल सिझन १ लेदर बॉल क्रिकेट चॅम्पियनशिपचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेचे उद्घाटन भाजपचे उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील यांच्या हस्ते आणि जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांच्या उपस्थितीत शनिवारी (दि. ८) झाले.

स्पर्धेच्या उद्घाटनावेळी युवा मोर्चाचे पनवेल शहर अध्यक्ष सुमित झुंझारराव, अमेय देशमुख, रवी सोळंकी, दिनेश जैन, संतोष कुंवर, स्वरूप वाणी, रितेश चौधरी, हर्षल गडकर आदी उपस्थित होते. ही स्पर्धा पनवेल शहरातील मिडलक्लास हौसिंग सोसायटीच्या मैदानावर महिनाभर सुरू राहणार आहे.









## अलिबाग येथे गुरुवारी क्रिकेट नियम परिसंवाद

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील क्रिकेट पंच व क्रिकेटप्रेमींसाठी अलिबाग येथे माणुसकी प्रतिष्ठानच्या पुढाकाराने व रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या मान्यतेने १३ फेब्रुवारी रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत क्रिकेट नियमांबाबत एक दिवसाच्या परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे.

या परिसंवादात क्रिकेटचे नियम शिकवले जाणार असून उपस्थित लोकांनी विचारलेल्या प्रश्नांना सविस्तर उत्तरे दिली जाणार आहेत. परिसंवादासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून बीसीसीआय पंच व माजी रणजीपटू हर्षद रावले पंच राजन कसबे, एमसीसी लॉ अभ्यासक व मार्गदर्शक नयन कट्टा उपस्थित राहणार आहेत.

परिसंवादामध्ये सहभागी होण्यासाठी नोंदणी आवश्यक आहे. नोंदणीची अंतिम तारीख १० फेब्रुवारी असून उपस्थित क्रिकेटपटूंना प्रमाणपत्र देण्यात येईल. अधिक माहितीसाठी संदीप जोशी (९१५८८२४२३३) किंवा डॉ. राजाराम हुलवान ७७२०९८१००० यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.



## मोग्रज आनंदवाडीत क्रिकेट स्पर्धा

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील मोग्रज ग्रामपंचायत हद्दीत असणाऱ्या आनंदवाडी येथे श्री प्रगटेश्वर नवतरुण मित्र मंडळाच्या वतीने क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. तीन दिवस चालणाऱ्या क्रिकेट स्पर्धेचे परिसरातील ३२ संघांनी सहभाग घेतला आहे.

स्पर्धेचे उद्घाटन माजी तंटामुक्त सदस्य अक्षय देशमुख यांच्या हस्ते झाले. स्पर्धेतील उद्घाटनाचा सामना चौधरवाडी संघ आणि भल्याचीवाडी या दोन संघांमध्ये झाला. या वेळी सामाजिक कार्यकर्ते भगवान भगत, पुष्पा भगत, प्रकाश बांगारी, पांडुरंग पुंजारा, पुंडलिक उघडे, सुरेश शिंगावर, अशोक भगत, संतोष शीद, राजेंद्र उघडे, सचिन पुंजारा, सोमनाथ शिंगवा, सुनील जुगरे, जयवंत वरगडा, निलेश शिंगवा, दत्त थोराड, पप्पू सांबरी, शरद शीद, राहुल पुंजारा, नितीन उघडे, हेमंत शिद, रवी पुंजारा, पावन शिंगवा, मोहन पुंजारा, प्रदीप दरवडा, रोहिदास शिंगवा, हनुमंत शिंगवा, लालचंद भगत, संदेश शिंगवा, रोहन पुंजारा, साईनाथ शीद, गणेश शीद, रमेश पुंजारा, गौरव भला, कृष्णा झुगरे, दशरथ दरवडा आदी उपस्थित होते.








दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**


हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राइड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com